# Deposit Policy
# FY 2026-27

**Version – 1.0**

**Approved by**

**BoD Meeting dtd. 29th April, 2026 vide R. No. 4(9)**

# ठेव धोरण

## आर्थिक वर्ष
## २०२६-२७

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office
Code No. 0
Scheduled Bank

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | ४ |
| २) | आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचे ठेव धोरणामधील उद्दिष्टे | ४ |
| ३) | ठेवी संबंधी - | ५ |
| | अ) बचत ठेव खाते | ५ |
| | ब) चालू ठेव खाते | ६ |
| | क) नियमीत मुदत ठेव व इतर ठेव खाती | ७ |
| ४) | ठेवींचे व्याजदर ठरविण्याचा अधिकार | ८ |
| ५) | मुदत ठेवीवरील कर्जे | ८ |
| ६) | DICGC विमा संरक्षण | ८ |
| ७) | तक्रार आणि तक्रारींचे निवारण | ८ |
| ८) | ग्राहकांच्या माहितीची गोपनियता | ८ |
| ९) | ठेवीबाबत व्यवहाराची कार्यपध्दती | ८ |
| | अ) नवीन ठेव खाते उघडणेबाबत. | ८ |
| | ब) खातेचे Signatories बाबत | ९ |
| | क) संयुक्त खातेबाबत | ९ |
| | ड) वयोवृध्द, आजारी, अपंग आणि अंध व्यक्तींच्या खात्यावरील व्यवहार | ९ |
| | इ) नामनिर्देशन सुविधा | १०-११ |
| | ई) ठेवींचे व्याजदर व व्याज आकारणी | ११-१३ |
| | फ) मुदतपूर्व ठेवींच्या बाबतीत | १३ |
| | ग ) मुदत पुर्व ठेवींचे पुर्नगुंतवणूकीबाबत. | १३ |
| | घ) परिपक्व ठेवींच्या बाबतीत | १३-१५ |
| | च) डुप्लीकेट ठेव दाखला/पावती देणेचे अधिकार | १५ |
| | छ) वारसप्रकरणे | १५ |
| | ज) निष्क्रिय खात्यांचे बाबतीत | १५-१७ |
| | झ) अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर | १७ |
| | ट) सर्व ठेवींची रक्कम मिळून ठेवीची रक्कम रोख अदा करणेबाबत | १७ |
| | ठ) अंगठेधारक खातेदारांच्या व्यवहाराबाबत | १७ |
| १०) | स्थायी सूचना बाबत | १७ |
| ११) | चेकबुक आकार | १८ |
| १२) | आनुषंगिक शुल्क बाबत | १८ |
| १३) | व्हाऊचर पासिंग मर्यादाबाबत | १८ |
| १४) | रू.५ लाख व त्यावरील रोखीचे व्यवहारांबाबत - | १८ |
| १५) | शाखांतर्गत व्यवहारासाठी नियमावली | १८ |
| १६) | Account Closure Charges | १९ |



The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

## Annexure - I To XI


| | | |
|---|---|---|
| १) | बेसीक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते | २० |
| २) | CBS सिस्टीममध्ये Fixed Deposits, Pension Deposit व RIS यांचे Auto Renewal Facility बाबत | २१-२२ |
| ३) | अर्बन टॅक्स सेव्हींग्ज डिपॉझिट व कुटुंबप्रमुख टॅक्स सेव्हींग्ज डिपॉझिट स्किमबाबत. | २३-२४ |
| ४) | व्याजातून आयकर कपातीबाबत. | २५-२७ |
| ५) | Unclaimed Deposit च्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग करणेबाबत | २८-३० |
| ६) | शाखा अंतर्गत ग्राहकांनी केलेल्या रोख व्यवहाराबाबत | ३१ |
| ७) | कॅश भरणा बाबत | ३२-३३ |
| ८) | अधिकार पत्र | ३४ |
| ९) | ग्राहक सेवा व घ्यावयाची दक्षता | ३५ |
| १०) | स्वयंघोषणापत्र- अ,ब व क | ३६-३८ |
| ११) | हमीपत्र | ३९ |


The Karad Urban Co-op. Bank Ltd; Head Office
Code No. 0
Scheduled Bank

# ठेव धोरण
# सन २०२६-२७

## १) प्रस्तावना :-

ठेवी स्विकारणे आणि ठेव खात्यांची देखभाल करणे (Acceptance of Deposit and Maintenance of Deposit) ही बँकेची मुख्य क्रिया आहे.

बँकिंग नियमन अधिनियम १९४९ मध्ये परिभाषित केलेनुसार "बँकिंग" या शब्दाचा मुळ कायदेशीर अर्थ जनतेकडून कर्ज/ गुंतवणूकीसाठी रक्कम स्विकारणे, मागणीवर परतफेड करणे किंवा चेक/डिमांड ड्राफ्ट द्वारे पैसे देणे, अशाप्रकारे ठेवी या बँकेचा मुख्य स्त्रोत आणि मुख्य आधार आहे. तसचे पुरेशी ठेव जमा करणे हे बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. मागील आर्थिक वर्षाअखेरील ठेवींचा खालीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

**आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेरील ठेवींचा आढावा-**

(रक्कम रू.लाखात)

| तपशिल | ३१/०३/२०२६ | उद्दिष्ट | प्रमाण (%) | ३१/०३/२०२५ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| चालू ठेव | ३१३३६.१५ | २६५२५.०० | ११८.१४% | २३२३०.३० | ८१०५.८५ |
| बचत ठेव | ६८३१२.०० | ६६५४५.०० | १०२.६६% | ६०७८६.०६ | ७५२५.९४ |
| मुदत ठेव | ३००४६४.२७ | २९१२६९.९० | १०३.१६% | २७३३८७.०७ | २७०७७.२० |
| **एकूण ठेवी** | **४००११२.४२** | **३८४३३९.९०** | **१०४.१०%** | **३५७४०३.४३** | **४२७०८.९९** |

**संस्था ठेवी -**

| तपशिल | ३१/०३/२०२६ | एकूण ठेवींशी प्रमाण (%) | ३१/०३/२०२५ | एकूण ठेवींशी प्रमाण (%) | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| चालू ठेव | २२४५.७७ | ०.५६% | १६५९.९९ | ०.४६% | ५८५.७८ |
| बचत ठेव | ५६.९५ | ०.०१% | ९२.०० | ०.०३% | (३५.०५) |
| मुदत ठेव | ४७५१९.०३ | ११.८८% | ३९४३४.७० | ११.०३% | ८०८४.३३ |
| **एकूण ठेवी** | **४९८२१.७५** | **१२.४५%** | **४११८६.६९** | **११.५२%** | **८६३५.०६** |

## २) आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचे ठेव धोरणामधील उद्दिष्टे -

चालू वर्षातील आर्थिक घडामोडींचा तसेच बँकिंग क्षेत्रातील महत्वाच्या बदलांचा आणि बँकेच्या सध्याच्या ठेवींचे व्याजदरानुसार, रक्कमेनुसार असणारी रचना व व्याजदर तसेच, ठेव संकलनाबाबतचा पूर्वीचा अनुभव या सर्व बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे उद्दिष्ट ठेवून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ठेव धोरण तयार केलेले आहे.

**उद्देश :-**

१. बँकेच्या एकूण व्यवसाय वाढीच्या प्रमाणात (Growth) ठेव वाढीचे उद्दिष्ट ठरविणे.
२. ठेव उभारणीचा सरासरी दर (Cost of Deposit) किमान राखणे.
३. ठेवीचा मिक्सअप- कमी व्याजदराच्या ठेवी, बिनव्याजाच्या ठेवी आणि जास्त व्याजदराच्या ठेवी याचे प्रमाण ठरविणे.
४. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रचलित आदेश, परिपत्रके आणि सूचना यांचे पालन करणे. महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा, बँकिंग नियंत्रण कायदा, बँकेचे पोटनियम, बँकेचे ठेवी विषयक प्रचलित परिपत्रके व नियमांचे पालन करणे व पारदर्शकता आणणे.
५. सन २०२६-२७ मध्ये ठेवींच्या नवीन योजना आवश्यकतेनुसार ठरविणे.
६. बँकेमध्ये प्रचलित असणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यकतेनुसार योग्य बदल करणे आणि ॲसेट लाएबिलीटी मॅनेजमेंट मधील मिसमॅचनुसार ठेवींची मुदत व व्याजदराचा विचार करून नवीन ठेव योजना कार्यान्वित करणे

The Karad Urban Co.op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

## ३) ठेवी संबंधी –

ग्राहकांना हवे असलेले आणि त्यांच्या व्यावसायिक स्थितीनुसार आपल्या बँकेने सर्वोकृष्ट अशा ठेव योजना त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्राहक एखाद्या कंपनीत नोकरीला असो किंवा त्याचा स्वतःचा व्यवसाय असो, त्यास एक मजबूत बँक सहकारी हवी असते. दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेपाशी ग्राहकांसाठी अचूक निराकरण आहे. इतकेच नव्हे तर भविष्यासाठी ग्राहकांच्या आरेखनात सुधारणा करेल अशा खालीलप्रमाणे ठेव योजना आपल्या बँकेने उपलब्ध करून दिल्या आहेत–

### अ) बचत ठेव खाते–

#### १) निवासी भारतीयांसाठी बचत खाते–

बचत खाती खास करून कालांतराने निधी जमा करण्यासाठी, भविष्यासाठी बचतीची सवय अंगी बाणविण्यासाठी आहेत. ग्राहकाचा व्यवसाय (Occupation) कोणताही असो, आपल्या बँकेने निवासी भारतीयांसाठी खालीलप्रमाणे बचत ठेव योजना उपलब्ध करून दिल्या आहेत–

| अ.क्र. | खाते प्रकार | तिमाही सरासरी शिल्लक आवश्यक |
|---|---|---|
| १) | नियमित बचत खाते | रू.१०००.०० |
| २) | लिटल चॅम्प बचत खाते | रू.५००.०० |
| ३) | सेन्टविन गोल्ड बचत खाते | रू.२५,०००.०० |
| ४) | सेन्टविन प्लॅटिनम बचत खाते | रू.५०,०००.०० |
| ५) | सेन्टविन गोल्ड प्लॅटिनम बचत खाते | रू.१,००,००१.०० |

ग्राहकांना बचत खात्याद्वारे धनादेश देता येतो, डिमांड ड्रॉफ्ट काढता येतो आणि रोख पैसे काढता येतात. तसेच या खात्यावर सेफ डिपॉझिट लॉकर, सी.टी.डी अणि मुदत ठेवी या सुविधांचा लाभ घेता येतो. पेअेबल ॲट पार धनादेश पुस्तिका आणि डेबीट कार्डची देखील सुविधा उपलब्ध आहे. सर्व खातेदारांना शाखेत विनामुल्य पासबुक तसेच ई-मेल स्टेटमेंट सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी सेवा शुल्क परिपत्रकाचा आणि त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांचा संदर्भ घेणेचा आहे.

**नियमित बचत ठेव खाते – (GL Base 5-Savings)**

- या बचत ठेव खात्यामध्ये सामान्यतः केवळ व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब (Individual & HUF) यांनाच खाते उघडता येतील.
- सोसायटी किंवा ट्रस्ट (Society & Trust) ग्राहकांना धर्मादाय आयुक्त (Charity Commissioner) यांच्याकडून प्राप्त नोंदणी प्रमाणपत्र किंवा इन्कम टॅक्स कायद्याच्या अंतर्गत १२ अ सर्टिफिकेट किंवा भारत सरकारच्या दर्पण पोर्टलवर नोंदणी केल्याचा पुरावा असल्याशिवाय नियमित बचत ठेव खाते उघडता येणार नाही.
- बचत गट (SHG) यांना सर्व के.वाय.सी.ची पूर्तता केल्यानंतर नियमित बचत खाते उघडता यईल. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यवसाय करणाऱ्या संस्थांना नियमित बचत ठेव खाते उघडता येणार नाही. (म्हणजेच Propritorship, Partnership, Company, LLP इत्यादी यांना नियमित बचत ठेव खाते उघडता येणार नाही)

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Scheduled Bank

- महाराष्ट्र शासनाच्या सहकार आयुक्ताकडे नोंद झालेल्या संस्था यांना देखील नियमित बचत ठेव खाते उघडता येणार नाही. (उदा.सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी पाणीपुरवठा संस्था, इत्यादी)
- ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपालिकेतील समित्या, पचायत समिती, इत्यादी अशा स्थानिक प्रशासकीय यंत्रणांना देखील नियमित बचत खाते उघडता येणार नाही.

**२) अनिवासी भारतीयांसाठी बचत खाते/मुदत ठेव खाते –**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे धोरणाप्रमाणे अनिवासी भारतीयांठी (NRI) बचत खाते तसेच मुदत ठेव खाते या सुविधा आपल्या १५ शाखांमध्ये उपलब्ध आहे. शाखांना सध्या चालू असणाऱ्या NRE खात्यांमध्ये अनुमत (Permissible) Credit स्विकारता येईल.

**अनिवासी भारतीयांच्या खात्यासंबंधी महत्त्वाचे–**

१. NRE बचत ठेवीवरील व्याजदर Domestic ठेवींवरील व्याजदरापेक्षा जास्त ठेवता येणार नसून व्याजदर ठरविण्याचे अधिकार मा.संचालक मंडळ सभेस आहेत.

२. NRE मुदत ठेवी १ वर्षे ते ३ वर्षे या कालावधीसाठी स्विकारता येतील.

३. NRE ठेवी स्विकारण्याचे परवानगी गुरूवारपेठ, तळभाग, सातारा शहर, उंब्रज, कोरेगाव, वडूज, सांगली, कोल्हापूर, गुलटेकडी पुणे, कसबापेठ पुणे, कर्वेरोड पुणे, सोलापूर, चिपळूण, कॅम्प पुणे व मस्जीद बंदर मुंबई या १५ शाखांना आहे.

४. बांग्लादेश तसेच पाकिस्तानचे नागरिकत्व असलेल्या अनिवासी भारतीयांना NRE बचत व मुदत खाते ही सुविधा उपलब्ध नाही.

५. अनिवासी भारतीयांची खाती Lien Mark करता येणार नाहीत.

६. अनिवासी ठेवींसाठी, सर्वसाधारण ठेवींसाठी लागणारे सर्व नियम लागू होतील.

७. NRE ठेवीसाठी Income Tax लागू नसल्यामुळे TDS ची Provision लागू असणार नाही.

**ब) चालू ठेव खाते–**

ग्राहकांच्या सतत वाढत जाणाऱ्या व्यावसायिक गरजा पाहता आपल्या बँकेने ग्राहकांच्या व्यवसायाला अगदी साजेसा पर्याय खालीलप्रमाणे चालू ठेव योजना उपलब्ध करून दिल्या आहेत–

| अ.क्र. | खाते प्रकार | तिमाही सरासरी शिल्लक आवश्यक |
|---|---|---|
| १) | नियमित चालू ठेव खाते | रू.५,०००.०० |
| २) | सेन्टविन गोल्ड चालू ठेव खाते | रू.५०,०००.०० |
| ३) | सेन्टविन प्लॅटिनम चालू ठेव खाते | रू.१,५०,०००.०० |

ग्राहकांना चालू ठेव खातेद्वारे धनादेश देता येतो, डिमांड ड्रॉफ्ट काढता येतो आणि रोख पैसे काढता येतात. शहरांतर्गत सोयीस्कर व्यवहार करता येतात. CBS सुविधा असल्यामुळे कोणत्याही शाखेत चेकचे पेमेंट ग्राहकांना उपलब्ध होऊ शकते. चालू ठेव खातेच्या ग्राहकांना सेफ डिपॉझिट लॉकर, सी.टी.डी., तसेच मुदत ठेवी योजनांचा लाभ घेता येतो. पेअेबल ॲट पार धनादेश व डेबीट कार्डची सुविधा देखील उपलब्ध आहे. पासबुक व ई-मेल स्टेटमेंट ही सुविधा चालू ठेव खातेदारांना विनामुल्य उपलब्ध आहे. अधिक विस्तारीत माहिती लागू असलेल्या सेवा शुल्क परिपत्रकामध्ये दिलेली आहे.

Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

**नियमित चालू ठेव खाते – (GL Base Code 16-Current)**

- कोणत्याही प्रकारची व्यक्ती किंवा संस्था नियमित चालू ठेव खाते उघडू शकते. याकरिता ग्राहकास चालू ठेव खात्याबद्दलच्या सर्व अटी शर्ती त्यांना मान्य असल्या पाहिजे.
- दि.०१/०४/२०२५ पासून आपण नियमित चालू ठेव खात्यांसाठी किमान तिमाही सरासरी रक्कम (QAB-Quarterly Average Balance) रुपये ५,०००/- अशी निश्चित केलेली आहे. तरी ग्राहकांना खात्यावरील शिल्लक रक्कम ठेवण्यासाठी सवय सुरवातीपासून लागावी या कारणास्तव नियमित चालू ठेव उघउतानाच सुरूवातीची रक्कम (Initial Funding-First Credit) किमान तिमाही सरासरी एवढीच म्हणजे रुपये ५,००००/- असावी आणि ती केवळ रोख स्वरुपातच असावी असा बदल केलेला आहे.
- नियमित चालू ठेव खाते उघडल्यानंतर अशा खात्यावरील पाहिली जमा रक्कम केवळ रोख स्वरुपात रुपये ५,०००/- असावी आणि ती केवळ रोख स्वरुपातच असावी असा बदल केलेला आहे.
- नियमित चालू ठेव खाते उघडल्यानंतर अशा खात्यावरील पहिली जमा रक्कम केवळ रोख स्वरुपात रुपये ५,०००/- नेच होईल असा देखील CBS सिस्टिम मध्ये लॉक लावण्यात आलेला आहे.

**क) नियमित मुदत ठेव व इतर ठेव खाती–**

१) दीर्घकालीन गुंतवणूक आणि अधिक व्याज मिळविण्यासाठी ग्राहकांनी आपल्या बँकेत पैसे गुंतविण्यासाठी विविध नियमित मुदत ठेव योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. लवचिकता, सुरक्षितता आणि अधिक प्राप्ती देणाऱ्या मुदत ठेव योजना ही खास वैशिष्टे असून याचा लाभ व्यक्ति आणि संस्था घेत आहेत. मुदत ठेव व सी.टी.डी. ठेवीस कमीत कमी ठेव रक्कम खालीलप्रमाणे राहील–

| अ.क्र. | खाते प्रकार | किमान रक्कम रू. |
|---|---|---|
| १) | मुदत ठेव | रू.१००.०० |
| २) | सी.टी.डी. ठेव | रू.५०.०० |

२) ठेवींचे आपोआप नूतनीकरण योजना (Auto Renewal Scheme) विशेष योजना व्यतिरिक्त सरळव्याज पध्दतीच्या व चक्रवाढ व्याज पध्दतीच्या मुदत ठेवींचे (A/c Type 401, 405 व 410 साठी) नुतनीकरण मुदत संपल्यानंतर आपोआप पुर्वीच्या मुदत ठेव कालावधीने मुदत संपलेल्या तारखेस नूतनीकरण होणार आहे. त्या कालावधीसाठी असणाऱ्या व्याजदराने ठेवीदाराचे लेखी संमतीने आपोआप नूतनीकरण केले जाईल. सदर योजनेचा तपशील 'Annexure II' मध्ये दिलेला आहे.

३) आयकरात वजावट मिळणेसाठी आपल्या बँकेने दि.०१/०९/२००६ पासून अर्बन टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट व कुटुंबप्रमुख टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट स्किम सुरू केली आहे. विस्तृत माहिती Annexure III मध्ये देण्यात आली आहे.

४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्गदर्शक तत्वानुसार Money Circulation/ Multi Level Marketing/ Pyramid Structures अशा Activities मध्ये involve असणाऱ्या व्यक्तिंचे किंवा संस्थेचे कोणत्याही प्रकारचे बचत, चालू व मुदत ठेव खाते उघडणेचे नाही.

**५) नॉन शेड्यूल्ड सहकारी बँकांच्या ठेवींबाबत –**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे दि.१९ नोव्हेंबर २०१५ रोजीचे परिपत्रक क्र.RBI/2015-16/236/DCBR.BPD.(PCB) Cir No.8/16.20.000/2015-16 नुसार को–ऑपरेटिव्ह बँकांना काही अटींची पूर्तता केल्याशिवाय नॉन शेड्यूल्ड सहकारी बँकांच्या नवीन ठेवी स्विकारता येणार नाहीत.

सध्या बँकेकडील नॉन शेड्यूल्ड सहकारी बँकांच्या ठेवी 'निरंक' आहेत.

६) स्वल्पसंचय ठेवी गोळा करण्यासाठी बँकेकडून पिग्मी एजंट नेमणूक केली जाईल. या पिग्मी एजंटांना कमिशन परिपत्रक क्र.५१२ पुरवणी क्र.६ नुसार देण्यात येईल.

## ४) ठेवींचे व्याजदर ठरविण्याचा अधिकार :-

रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे ठेवीवरील व्याजदर ठरविण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास आहेत, बाजारातील परिस्थिती, प्रतिस्पर्ध्यांचे दर, रिझर्व्ह बँकेचे पतधोरण आणि ठेवींची आवश्यकता यांचा सर्वंकष विचार करुन मा.संचालक मंडळ वेळोवेळी ठेवींचे दर ठरवतील. सदरचे व्याजदर परिपत्रकाद्वारे शाखांना कळविले जातील आणि त्याची योग्य ती जाहिरात / प्रसिध्दी मुख्य कार्यालय - मार्केटिंग विभागामार्फत केली जाईल.

## ५) मुदत ठेवीवरील कर्जे :-

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा व बँकेचे कर्ज धोरणानुसार आवश्यक मार्जीन ठेवून मुदत ठेवीवर कर्ज देणेचे आहे.

## ६) Deposits Insurance and Credit Guarantee Corporation (DICGC) विमा संरक्षण-

बँकेची Long Term Deposit ही स्किम वगळता बँकेचे सर्व ठेवींना DICGC अंतर्गत विमा संरक्षण आहे. (मर्यादा व अटी लागू) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दि.०४/०२/२०२० च्या परिपत्रकानुसार सर्व ठेवीदारांसाठी विमा संरक्षण मर्यादा (मुद्दल+व्याज रक्कमेसाठी) रू.५ लाख एवढी करणेत आलेली आहे. तसेच DICGC या संस्थेस ठेव विमा हप्त्याची रक्कमेची पावती सर्व शाखांच्या दर्शनी भागात नोटीस बोर्डवर लावणेसाठी देणेची आहे. विम्याविषयी माहिती सर्व ठेवीदारांना उपलब्ध करून देणेचे आहे.

## ७) तक्रार आणि तक्रारींचे निवारण-

बँकिंग सेवेविषयी ठेवीदारांना असणाऱ्या तक्रारींचे निवारण बँकेने नियुक्त केलेले अधिकारी यांनी निर्धारित वेळेत करणेचे असून यासंबंधी माहिती शाखांनी नोटीस बोर्डवर लावणेची आहे. असंतुष्ट ठेवीदारास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी नियुक्त केलेल्या बँकिंग लोकपालाकडे (Banking Ombudsman) जाण्याचा अधिकार राहील.

## ८) ग्राहकांच्या माहितीची गोपनियता-

बँकेत ठेव खाते उघडतेवेळी ग्राहकांकडून घेतलेली माहिती गोपनीय ठेवण्यात येईल. त्याचा वापर अन्य संस्थासाठी बँकेच्या इतर सेवांसाठी केला जाणार नाही. संबंधित व्यवहाराशी असलेली बँकेची जोखीम विचारात घेवून आवश्यक तेवढी माहिती ग्राहकांकडून घेण्यात येईल. कोणत्याही प्रकारची अनावश्यक माहिती घेतली जाणार नाही. बँकेस आवश्यक वाटल्यास खाते उघडल्यानंतर ग्राहकाचे संमतीने स्वतंत्रपणे वेगळी माहिती मागविली जाईल.

## ९) ठेवीबाबत व्यवहाराची कार्यपध्दती-

### अ) नवीन ठेव खाते उघडणेबाबत -

कोणत्याही प्रकारचे नवीन खाते उघडताना (Savings, Current, Term Deposit, CTD,.. etc.) खाते सुरू करणेसाठी सुरुवातीस खालीलप्रमाणे रक्कम रोखीने किंवा धनादेशाने स्विकारता येईल.

- रोखीने (By cash)
  १) वैयक्तिक बचत व मुदत ठेव खाते सुरू करणेसाठी आरंभिक रोख रक्कम रू.५०,०००/- व रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास पॅन व आधार कार्ड घेवून स्विकारता येईल.
  २) बेसीक सेव्हिंग्ज बँक डिपॉझीट खाते वगळता अन्य सर्व खाती उघडण्यासाठी पॅन असणे आवश्यक आहे.

- धनादेशाने (By Transfer/Clearing Cheque)

  वैयक्तिक किंवा गैरवैयक्तिक बचत, चालू किंवा मुदत ठेव खाते सुरू करणेसाठी आरंभिक रक्कम खाते उघडणाऱ्याच्या इतर बँकेच्या स्वतःचे खात्यामधील चेकने (Drawer व Payee) एकच असणे आवश्यक असल्यास स्विकारता येईल.

**ब ) खातेचे Signatories बाबत –**

सर्व खातेंना Signature display साठी Customer ID चीच Signature घेणेची आहे. फक्त स्वतंत्र Signture Scan करणेची नाही.

**क) संयुक्त खातेबाबत :–**

**(I) वैयक्तिक (Individual) खाती –**

- कोणत्याही Individual चे संयुक्त खाते उघडताना जास्तीत जास्त ३ (तीन) व्यक्तीचे खाते सुरू करता येईल. जर ३ पेक्षा जास्त व्यक्तींचे खाते सुरू करावयाचे असल्यास उपमहाव्यवस्थापक/महाव्यवस्थापक, हिशोब विभाग यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.
- मुदत ठेव खाते जर Either or Survivor या सूचनेप्रमाणे उघडले असल्यास, मुदत संपल्यानंतर ठेवींची रक्कम परत करण्यासाठी सर्व ठेवीदारांच्या मंजुरीच्या स्वाक्षरीची आवश्यकता नाही. मात्र मुदतपूर्व ठेव रक्कम परत करण्यासाठी सर्व ठेवीदारांची मंजुरी/स्वाक्षरी घेणे आवश्यक राहील.
- मुदत ठेव खाते जर Former or Survivor या सूचनेप्रमाणे उघडले असल्यास, मुदत संपलेनंतर ठेवींची रक्कम परत करण्यासाठी फक्त Former ठेवीदारांची मंजुरी/स्वाक्षरी लागेल परंतु मुदत पूर्व ठेव मोडण्यासाठी सर्व ठेवीदारांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

**(II) ठेव खात्यासाठी संयुक्त खातेदाराचे नाव वाढविणे व कमी करणे–**

ठेव खात्यासाठी संयुक्त ठेवीदाराचे नाव वाढविणेचे असलेस तसेच कमी करणेचे असलेस खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे–

१. ठेव खातेदार / खातेदारांची लेखी संमती घेणे.
२. सर्व ग्राहकांची के.वाय.सी. कागदपत्रे घेणे.
३. नवीन ठेव पावती / पासबुक न देता किमान दोन अधिकृत अधिकाऱ्यांनी सध्याच्या ठेव पावती / पासबुकवर नाव वाढविणे / कमी करणेचे आहे.
४. संयुक्त ठेवीदाराचे नाव वाढविताना ३ (तीन) पेक्षा जास्त व्यक्ती होत नाहीत ना याची खात्री करणे.
५. संयुक्त मुदत ठेवीच्या संबंधित मूळ ठेवीची रक्कम अथवा मुदत बदलता येणार नाही.
६. खाते उघडताना कोणत्याही प्रकारचे विचलन (Deviation)/अपवाद (Exception) असल्यास शाखेने त्यांच्या उपमहाव्यवस्थापक/साहा.महाव्यवस्थापक, व्यवसाय विकास यांच्या शिफारशीनुसार मा.उपमहाव्यवस्थापक/ महाव्यवस्थापक, हिशोब विभाग यांची मंजुरी घेणेची आहे.

**ड) वयोवृध्द, आजारी, अपंग आणि अंध व्यक्तींच्या खात्यावरील व्यवहार –**

प्रत्यक्ष बँकेमध्ये येवून विड्रॉवलने रक्कम काढणे किंवा चेकवर सही करणे शक्य नसेल, परंतु निशाणी अंगठा उठवण्याइतपत सक्षम असलेस **किंवा** प्रत्यक्ष बँकेत येणे, सही करणे आणि निशाणी अंगठा उठविणे यापैकी काहीही शक्य नसलेस, प्रत्यक्ष ग्राहकापर्यंत पोहचवून, हाताच्या किंवा पायाच्या निशाणी अंगठ्यासहीत दोन साक्षीदार पैकी एक जबाबदार बँक अधिकारी यांनी प्रमाणित केलेले दस्तऐवज (चेक/विड्रॉवल इ.) यांचे आधारे रक्कम काढता येईल. अंध व्यक्ती करार करण्यास पात्र असल्याने त्यांना बँकिंग सुविधेपासून वंचित ठेवले जावू नये असे रिझर्व्ह बँकेने कळविले आहे, त्यामुळे अंधांना चेकबुक, एटीएम, लॉकर इ. सुविधा इतर सामान्य ग्राहकांप्रमाणेच देण्यात येतील, आवश्यक तेथे सेवकांनी मदत/सहकार्य करणेचे आहे.

**इ) नामनिर्देशन (Nomination) सुविधा :-**

बँकिग कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२५ अंतर्गत नामनिर्देशनाशी संबंधित प्रमुख तरतुदी दि.१ नोव्हेंबर २०२५ पासून अंमलात आली आहे. प्रत्येक ठेव खातेसाठी ठेवीदारांना चार व्यक्तीचे नॉमिनी म्हणून नॉमिनेशन करता येईल. याबाबत बँकिंग नियमन कायद्यात बदल झालेला आहे. जर ठेवीधारास ठेव खातेसाठी नॉमिनेशन करावयाचे नसेल तर तसे ठेवीदारांकडून ठेव खातेस नॉमिनी नोंद करणार नसलेबाबत स्वतंत्र लेखी पत्र घेणे आवश्यक असून शाखा व्यवस्थापकाचे त्या पत्रावर Approval असणे बंधनकारक आहे.
नामनिर्देशन/रद्द केलेले नामनिर्देशन/बदल केलेले नामनिर्देशन यांच्या अंमलबजावणीमध्ये केवळ ठेवींच्या नुतनीकरणामुळे कोणतेही बदल होणार नाहीत.
संयुक्त खातेदारांच्या ठेवींचे नामनिर्देशन रद्द करताना अथवा त्यामध्ये बदल करताना हयात असलेल्या सर्व खातेदारांची मंजुरी असणे गरजेचे आहे.
जर नामनिर्देशित व्यक्ती (अल्पवयीन) अज्ञान असल्यास, ठेवींदारांनी नामनिर्देशन करताना अज्ञान व्यक्तीच्या वतीने रक्कम स्विकारण्यासाठी सज्ञान व्यक्तीची नेमणूक करावी. जास्तीत जास्त ठेवीसाठी नामनिर्देशन करण्यासाठी ठेवीदारांना उद्युक्त करावे.

- बँक ग्राहकांना आता आपल्या सर्व प्रकारच्या ठेव खात्यांना एकाऐवजी जास्तीत जास्त चार जणांचे नामनिर्देशन करता येईल. ठेव खात्यात एकाच वेळी (Simultaneous) तसेच क्रमिक/एकापाठोपाठ एक (Successive) अशाप्रकारे नामनिर्देशन करता येईल.
- **एकाच वेळी (Simultaneous)**
  एकाचवेळी चार जणांचे नामनिर्देशन ह्याचा अर्थ असा, की आता जे फक्त एकाच व्यक्तीचे नामनिर्देशन करता येते त्याऐवजी आधिक व्यक्तींचे पण जास्तीत जास्त चार जणांचे नामनिर्देशन करता येईल. ह्या चार जणांना ठेवीच्या किती टक्के रक्कम दिली जावी हेही नामनिर्देशन करतेवेळी स्पष्ट करावे लागेल. नामनिर्देशन संपूर्ण ठेव रकमेसाठी करावे लागेल. एकूण रक्कम १०० टक्के सुनिश्चित केलेली आहे. सर्व नॉमिनी व्यक्तींमध्ये पारदर्शक वितरण सक्षम करतात ह्या तरतुदींचे पालन न करता केलेले नामनिर्देशन ग्राह्य धरले जाणार नाही.
- बँकेकडून ठेवीची रक्कम परत मिळण्याअगोदर जर एखाद्या नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला तर केवळ अशा नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशनच रद्द झाले असे धरले जाईल व फक्त त्याच्या वाट्याचीच रक्कम नामनिर्देशनाविरहित आहे असे समजले जाईल. इतरांच्या नामनिर्देशनाला व त्यांना त्यांच्या वाट्याचे पैसे मिळायला त्यामुळे काही बाधा येणार नाही.
- **क्रमिक/एकापाठोपाठ एक (Successive)**
  ह्या पद्धतीने केलेले नामनिर्देशन केवळ एका व्यक्तीच्या बाबतीतच प्राधान्यक्रमानुसार प्रभावी होईल. ह्याचा अर्थ असा, की प्रथम क्रमांकावरील नामनिर्देशित व्यक्ती जर ज्या व्यक्तीने नामांकन केले आहे त्याच्या पश्चात हयात असेल तर त्याचे नामनिर्देशन प्रभावी धरण्यात येईल व त्याला पैसे देण्यात येतील. दुसऱ्या नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशन पहिल्या नामनिर्देशित व्यक्तीच्या मृत्यूनंतरच प्रभावी होईल. नामनिर्देशनाच्या यादीत सर्वात खालच्या क्रमांकावर असलेल्या नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशन यादीत ज्यांचे नाव वरती आहे अशा सर्व नामनिर्देशित व्यक्तींच्या मृत्यूनंतरच प्रभावी होईल. ठेवीदाराला/ग्राहकाला नामनिर्देशनाचा प्राधान्य क्रम ठरवण्याची मुभा असेल. परंतु जिथे नामनिर्देशनाचा प्राधान्यक्रम ठेवीदाराने/ ग्राहकाने नमूद केला नसेल तिथे यादीत ज्या क्रमाने नावे दिलेली आहेत त्या क्रमाने नामनिर्देशन करण्यात आल्याचे मानले जाईल. एकाहून अधिक व्यक्तींच्या नावे एकाच वेळी केलेल्या नामांकनांना (simultaneous) या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

- नामनिर्देशित व्यक्तीचे ठेवीदारापूर्वी निधन झाल्यास व ठेवीदार/ ग्राहक नवीन नामांकन करण्यास विसरल्यास ह्या सुविधेमुळे ठेव खाते नामनिर्देशनाविरहित राहाण्याचे टळेल. ठेव रक्कम नामनिर्देशनाविरहित असेल, तर वारसांना पैसे देण्यासाठी जी किचकट प्रक्रिया करावी लागते ती ह्या सुविधेमुळे करावी न लागता पुढील क्रमांकावरील नामनिर्देशित व्यक्तीला बँक पैसे/वस्तू देऊ शकेल. ह्या सुधारणांमुळे भविष्यात बँकिंग उद्योगात दावा न केलेल्या ठेवींचे प्रमाण कमी होईल.

**टीप :- ठेवीदारांना एकाच वेळी (Simultaneous) किंवा क्रमिक/ एकापाठोपाठ एक (Successive) या दोन्हीमध्ये विकल्प करता येईल.**

**नवीन बचत/चालू ठेव खात्यांमधील नामनिर्देशनाबाबत (Nomination)**

- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मागील काही सूचनांप्रमाणे व्यक्तिगत ठेव खात्यांमध्ये नामनिर्देशन असल्याबाबत विशिष्ठ मागोवा घेतल्याचे जाणवते.
- त्यामुळे व्यक्तिगत ठेव खात्यास (म्हणजेच वैयक्तिक आणि प्रोपरायटीशीप खातेदारांना मात्र) नामनिर्देशन सुविधा उपलब्ध राहील. प्रतिनिधी द्वारे वापरत असलेल्या ठेव खात्यांना (HUF/Partnership/ LLP/ Company/ Society/Trust) नामनिर्देशन सुविधा उपलब्ध राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
- त्यामुळे नव्यान उघडल्या जाणाऱ्या व्यक्तिगत स्वरुपातील बचत ठेव आणि प्रोप्रा. स्वरूपातील चालू ठेव खात्यांना नामनिर्देशन असायलाच पाहिजे. जिथे ग्राहक स्वत: नामनिर्देशनास नको असे म्हणतात ज्या-त्या बचत ठेव फॉर्ममध्ये तसे नमूद करावे किंवा स्वतंत्रपणे लेखी पत्राद्वारे लिहून द्यावे.
- यापुढे ज्या नवीन उघडल्या जाणाऱ्या व्यक्तिगत बचत/चालू ठेव खाते आणि प्रोप्रा स्वरूपातील चालू ठेव खात्यांना नामनिर्देशन नसेल अशा शाखेनिहाय खात्यांना आढावा घेतला जाईल. ग्राहकांनी नामनिर्देशन नको असे लिहून दिल्याचा पुरावा नसल्यास संबंधित शाखेला समज दिला जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ई) ठेवींचे व्याजदर व व्याज आकारणी :-**

अ)

१. मुदत ठेवींचा कालावधी व रक्कम (रू.१ कोटी व अधिक) या बाबी लक्षात घेता, ठेवींसाठी अतिरिक्त व्याजदर ठरविता येतील. मुदत ठेवींचा किमान कालावधी सात दिवस व त्यापासून पुढे असेल. ठेवींसाठी अतिरिक्त व्याजदर ठरवण्यासाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात येईल तसेच ठेवींच्या अतिरिक्त व्याजदराबद्दलचा ठराव दर तिमाहीस संचालक मंडळासमोर माहितीसाठी मांडण्यात येईल.

२. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे धोरणानुसार सेव्हिंग ठेवींवर व्याजदर ठरविण्याचे अधिकार बँकेला दिले आहेत ते ठरविताना रू.१ लाखांपर्यंत सर्वांना Uniform व्याजदर व रू.१ लाखावरती Differential व्याजदर बँक देऊ शकते. व्याज देताना Unclaimed खात्यांना व्याज दिले जाणार नाही. व्याज जमा करताना Value Date ही Product Date म्हणून घेतली जाईल.

३. आजी, माजी सेवकांना बचत ठेव, मुदत ठेव यावर अतिरिक्त व्याजदर १% पेक्षा जास्त दिला जाणार नाही. ठेव रक्कम जर कायम सेवक व माजी सेवकांच्या वैयक्तिक स्वरूपाची असेल तर अतिरिक्त व्याज दिले जाईल. या ठेवींची रक्कम ही त्यांच्या वैयक्तिक स्वरूपाची आहे, असे स्वयंघोषणा पत्र (Annexure X प्रमाणे) लिहून घेणे आवश्यक आहे. (सेवकांमध्ये प्रोबेशनरी सेवकांचा समावेश होणार नाही, फक्त कायम असलेल्या सेवकांचा समावेश होईल निलंबित केलेले व निवृत्तपूर्वी राजीनामा दिलेले सेवक हे माजी सेवक म्हणून गृहीत धरले जाणार नाहीत.)

४. रविवार किंवा Non Business Working Day या दिवशी मुदत संपणाऱ्या ठेवींवर पुढच्या Working Day पर्यंत मूलतः करार झालेल्या व्याजदराने खालीलप्रमाणे व्याज देण्यात यावे.
  १) सरळव्याज पध्दतीच्या ठेवींसाठी मूळ मुद्दल रक्कमेवर ३६५ दिवसाप्रमाणे
  २) पुर्नगुंतवणूक व रिकरिंग ठेवींसाठी Maturity रक्कमेवर

५. बचत ठेव खाते निष्क्रिय असले तरी व्याज दिले जाईल. मुदत ठेव खात्यांची मुदत संपली असल्यास, अशा खात्यांना बचत खात्यास लागू असणाऱ्या व्याजदराने व्याज दिले जाईल. पिग्मी ठेव खाते निष्क्रिय असले तरी पिग्मी ठेव खात्यास लागू असणाऱ्या व्याजदराप्रमाणे व्याज अदा करण्यात येईल.

६. सेव्हिंग्ज ठेव खात्याची व्याज आकारणी दैनंदिन शिल्लक रक्कमेवर करणेत येईल. सदर व्याज सहामाही (३० सप्टेंबर/३१ मार्च) मध्ये दिले जाईल.

७. CTD व्याज आकारणी ही Quarterly Compounding on Base Amount + Interest Payable Amount वरती केली जाईल.

८. मुदत ठेवीची व्याज आकारणी मासिक, तिमाही, पुर्नगुंतवणूक या पध्दतीने केली जाईल. ज्या मुदत ठेवी दिवसांवरती (Days) केलेल्या आहेत त्याचे व्याज तिमाही अखेर एकूण होणाऱ्या दिवसांवर (Days) काढले जाईल व ज्या मुदत ठेवी मासिक/वार्षिक पध्दतीने उघडलेल्या आहेत त्याचे व्याज मासिक पध्दतीने जमा होईल.

९. चालू ठेवी वगळता सर्व ठेवींवर व्याज देणेचे आहे.

१०. वैयक्तिक अथवा प्रोप्रायटरशिप खातेदारांची चालू ठेव खात्याच्या Deceased Claim वरती मयत झालेल्या तारखेपासून बचत ठेवींप्रमाणे व्याजदर देण्यात यावे.

११. ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवींवर ०.६०% इतके अतिरिक्त व्याज देण्यात येईल. किंवा परिपत्रकाप्रमाणे वेळोवेळी होणाऱ्या बदलप्रमाणे व्याज दिले जाईल.

१२. मा.संचालक मंडळ सभेने मंजुरी दिलेल्या ठरावानुसार ठेवीवरील व्याजदर परिपत्रकामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतील व प्रचलित परिपत्रकाप्रमाणे व्याजदर लागू राहतील.

**(ब) शून्य व्याजदराबाबत (Zero Interest Rate) :-**

१. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार १० वर्षे किंवा १० वर्षे कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता In operative असणारी खाती ज्यांची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग केलेली आहे. सदर खातेस Credit Interest Pattern "Zero Interest Rate" नोंद केल्याने व्याज आकारणी होणार नाही.

२. प्रत्येक ठेवीचे प्रकारानुसार ठेवींवरील व्याजासाठी नफा तोटा खाती स्वतंत्र GL खाते ठेवले जाईल.

**(क) कार्ड दर (Card Rate) ठेवींच्या बाबतीत :-**

१. इतर बँकेचे तुलनेत व्यवसाय करणेसाठी (Card Rate) रू.१ कोटी व त्यावरील ठेवीचे दैनंदिन व्याजदर व कालावधी ठरवणेचा अधिकार, तसेच प्रचलीत व्याजदरापेक्षा १.२५% जास्त तसेच प्रचलीत कालावधीमध्ये १० दिवस कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रचलित व्याजदरापेक्षा १.२५% पेक्षा जादा व्याजदर देण्याचे अधिकार ही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच राहतील. Card Rate ने अदा केलेल्या ठेवींचे स्वतंत्र रजिस्टर ठेवणेत येईल.

२. Card Rate नुसार घेतलेल्या ठेवीस विशेष प्रोत्साहन न देता वैयक्तीक ठेवी वाढवण्याकडे कल राहील.

(ड) व्याजातून आयकर कपात :–

याबाबतची स्वतंत्र नियमावली केलेली असून ती सोबत Annexure IV मध्ये दिलेली आहे.

फ) मुदतपूर्व ठेवींच्या बाबतीत :–

१. सरळव्याज पध्दतीच्या मुदत ठेवीचे मुदतपूर्व वितरण करताना ७ दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी व्याज अदा करु नये व ७ दिवसानंतर मुदतपूर्व वितरण करताना पुर्ण झालेल्या कालावधीकरिता लागू असलेल्या व्याजदरातून अथवा करार झालेला व्याजदर यापैकी कमी असलेल्या व्याजदरातून १% दंडव्याज कपात करुन सरळव्याज पध्दतीने व्याज आकारणी करावी.

२. दामदुप्पट, दामदिडपट, CTD, अर्बन शताब्दी व RIS ठेवी मुदतपूर्व वितरण करताना ७ दिवसापेक्षा कमी कालावधीसाठी व्याज अदा करु नये व ७ दिवस पुर्ण झालेस मुदतपूर्व वितरण करताना पुर्ण झालेल्या कालावधीकरिता लागू असलेल्या व्याजदरातून अथवा करार झालेला व्याजदर यापैकी कमी असलेल्या व्याजदरातून १% दंडव्याज कपात करुन ७ दिवस ते १ वर्ष कालावधीसाठी सरळव्याज पध्दतीने व १ वर्षावरील कालावधीसाठी तिमाही चक्रवाढ व्याज (RIS) पध्दतीने व्याज आकारणी करावी.

३. अर्बन टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट व कुटुंब प्रमुख टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट स्किममधील ठेवी मुदतपूर्व मोडताना विशेष बाब म्हणून मा.महाव्यवस्थापक (हिशोब विभाग)/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीनुसार ठेवीच्या झालेल्या कालावधीचा विचार करुन मुदतपूर्व ठेवीचा व्याजदर देण्यात येईल.

४. खातेदार मयत झालेमुळे ठेव मुदतपूर्व मोडताना जर ठेवीला ७ दिवसांपेक्षा कमी कालावधी असलेस व्याज अदा करू नये. ७ दिवस पूर्ण झाल्यानंतर मुदतपूर्व ठेव मोडताना पूर्ण झालेल्या कालावधीकरिता लागू असणारा व्याजदर अथवा करार झालेला व्याजदर यापैकी कमी असलेल्या व्याजदराने व्याज आकारणी करावी. खातेदार मयत झाल्यामुळे ठेव मुदतपूर्व मोडताना १% दंडव्याजाची आकारणी करू नये.
जर ठेव रक्कम आर.आय.एस. प्रकारात गुंतवणूक केलेली असेल व १ वर्षाच्या आत ठेव मुदतपूर्व मोडली जात असलेस व्याजाची आकारणी सरळव्याज पद्धतीने करावयाची आहे.

५. मुदतपूर्व ठेव मोडताना वरीलप्रमाणे दंडव्याज व्यतिरिक्त इतर कोणताही दंड आकारला जावू नये.

६. अनिवासी ठेवींसाठी, सर्वसाधारण ठेवींसाठी लागू असणारे वरील सर्व नियम लागू होतील.

ग) मुदत पुर्व ठेवींचे पुर्नगुंतवणूकीबाबत :–

- बँकेतील कोणत्याही प्रकारची मुदत ठेव/सीटीडी इ. मुदतपूर्व परत घेवून पुन:श्च अन्य कोणत्याही ठेव प्रकारात गुंतवण्यात येत असेल तर, दंडव्याजाची आकारणी केली जाणार नाही मात्र अशा प्रकारे नवीन केलेल्या गुंतवणूकीची मुदत संपण्याची तारीख मूळ केलेल्या गुंतवणूकीच्या मुदत संपण्याच्या तारखेपेक्षा ७ दिवसांनी जास्त राहील.

घ) परिपक्व ठेवींच्या बाबतीत :–

१) परिपक्व ठेवीच्या (मुदत संपलेल्या) ठेवींचे नुतनीकरण होत असल्यास –

(अ) १४ दिवसांपर्यंत नुतनीकरणासाठी सादर झालेल्या ठेव पावत्यांचे As of Renewal होईल –

- १४ दिवसापर्यंत मुदत संपलेले तारखेस प्रचलीत असणाऱ्या व्याजदराने मुदत ठेवीचे नुतनीकरण करता येईल.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0

(ब) १४ दिवसानंतर –

- नुतनीकरणासाठी ज्या दिवशी ठेव पावती सादर करण्यात येईल, त्या दिवशीचा ज्या कालावधीसाठी मुदत ठेव नुतनीकरण करणार आहे तो दर किंवा मुदत ज्या तारखेस संपली त्या तारखेचा लागू असणारा व्याजदर यापैकी कमीत कमी व्याजदर असेल त्या व्याजदराने ठेव पावतीचे मुदत संपलेल्या तारखेपासून (As of Renewal of Deposit) किंवा याप्रमाणे यामधील कालावधीचे व्याज अदा करून ठेव पावती सादर केलेल्या तारखेपासून ठेवीचे नूतनीकरण करता येईल.
- पिग्मी ठेव खाते १४ दिवसांपर्यंत नुतनीकरणासाठी सादर झाल्यास, मुदत संपलेल्या तारखेस प्रचलित असणाऱ्या व्याजदराने ठेवीचे नुतनीकरण करता येईल.
  १४ दिवसानंतर ठेव पावती सादर केलेल्या तारखेचा लागू असणारा व्याजदर किंवा मुदत संपलेल्या तारखेस लागू असणारा व्याजदर यापैकी कमीत कमी व्याजदराने ठेव पावतीचे नुतनीकरण होईल.
- ज्या मुदत ठेवींची मुदत संपून १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता झालेली आहे (Unclaimed Deposit) अशा ठेवींच्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग कराव्या लागतात अशा ठेवींसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार ठेव पावती नुतनीकरणासाठी सादर केलेल्या तारखेपर्यंत व्याज रक्कम अदा करुन ठेव पावती सादर केलेल्या तारखेपासून नुतनीकरण केली जाईल. म्हणजेच मुदत ठेवीचे मुदत संपलेल्या तारखेपासून नुतनीकरण (As of Renewal of Deposit) होणार नाही.

  या ठेवी बँकेकडे असेपर्यंतच्या कालावधीसाठी बँकेच्या बचत खात्याचा व्याजदर लागू होईल व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे वर्ग केल्यानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेला व्याजदर लागू होईल.

२) जी मुदत ठेव खाती इन्फोर्समेंट ऑथोरिटीज यांनी गोठविली (Frozen) आहेत त्यांचे नुतनीकरण बाबतीत खालीलप्रमाणे धोरण राहील –

- संबंधीत खातेदाराने जर बँकेत मुदत ठेव नुतनीकरणासाठी विनंती अर्ज मुदत संपलेल्या तारखेपासून १४ दिवसांचे आत दिला असेल तर मुदत संपलेल्या तारखेपासून (As of date) प्रचलीत असणाऱ्या व्याजदराने मुदत ठेवीचे नुतनीकरण करता येईल, तसेच जर खातेदाराने मुदत ठेव नुतनीकरणासाठी विनंती अर्ज मुदत संपलेल्या तारखेपासून १४ दिवसानंतर दिला असल्यास नुतनीकरणासाठी ज्या दिवशी अर्ज सादर करण्यात येईल, त्या दिवशीचा मुदत संपलेल्या तारखेपासून झालेल्या दिवसांकरिता असणाऱ्या प्रचलीत व्याजदरानुसार किंवा जर मुदत ठेवीची मुदत संपून १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संपलेली असलेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सुचनेनुसार सरळ व्याज पध्दतीने व्याज रक्कमेसह मुदत ठेव पावती अर्ज सादर केलेल्या तारखेपासून प्रचलित व्याजदराने नुतनीकरण केले जाईल.
- वरीलप्रमाणे नुतनीकरण केलेल्या मुदत ठेव खातेची नवीन ठेव पावती इश्यू करणेची नाही. जुन्या ठेव पावतीवर नुतनीकरण करून देवून अकौंट ओपन फॉर्मवरती नुतनीकरणाची नोंद करणे.

३) ज्या मुदत ठेवी टेंडरसाठी/सिक्युरिटी म्हणून कॉन्ट्रक्टर यांनी गर्व्हमेंट ॲथोरिटी यांचेकडे मूळ मुदत ठेव पावती दिलेली असेल व अशा ठेवींची मुदत संपलेनंतर नूतनीकरण करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे–

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Code No. 5 Head Office Scheduled Bank

- संबंधित मुदत ठेव पावतीचे नूतनीकरण करणेसाठी संबंधित गर्व्हेमेंट ॲथोरिटी यांचेकडून सदरची पावती नूतनीकरण करणेसाठी लेखी सही शिक्क्यासह संमती (Request Letter) घेणे.
- संबंधित ठेवीचे नूतनीकरण केलेनंतर नवीन मुदत ठेव पावती देणेची नसून, शाखेने मूळ मुदत ठेव पावतीचे नोंदीसह नूतनीकरण तपशीलाचा दाखला संबंधित गर्व्हेमेंट ॲथोरिटी यांना देणेचा आहे.

**४) परिपक्व ठेवींचे नुतनीकरण होत नसल्यास:-**

परिपक्व ठेवींचे नूतनीकरण न केल्यास, सरळ व्याजाच्या मुदत ठेवींचे मुद्दल रक्कमेवर (Principle Amount) व पुर्नगुंतवणूक ठेवींचे (RIS) देय रक्कमेवर (Maturity Amount) सेव्हिंग्ज ठेव व्याजदराने झालेल्या कालावधीकरिता व्याज अदा करावे.

पिग्मी ठेवी परिपक्व झाल्यास ठेवीच्या मुदतीनुसार लागू असणाऱ्या व्याजदराने झालेल्या कालावधीकरिता व्याज अदा करावे.

**च) डुप्लीकेट ठेव दाखला/पावती देणेचे अधिकार :-**

ठेव पावती गहाळ झाल्यानंतर, सदर ग्राहकाने डुप्लीकेट ठेव पावती मिळण्याबाबतच्या केलेल्या अर्जामधील एकूण रक्कम विचारात घेता, डुप्लीकेट ठेव पावती देणेचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील.

| पद | अधिकार |
|---|---|
| | रक्कम रु. पर्यंत |
| शाखाव्यवस्थापक | १,००,०००.०० |
| साहा.महाव्यवस्थापक/उपमहाव्यवस्थापक (शाखा नियंत्रक एक्झिक्युटिव्ह) | १५,००,०००.०० |
| उपमहाव्यवस्थापक/महाव्यवस्थापक (हिशोब विभाग) | ३५,००,०००.०० |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | ७५,००,०००.०० |
| संचालक मंडळ | रु.७५ लाखाचे वर |

ठेव पावती गहाळ झालेली असल्यास, डुप्लीकेट ठेव पावती मिळणेबाबतच्या प्रक्रियेसाठी ग्राहकांनी हमीपत्र देणे बंधनकारक राहील. हमीपत्र (Indemnity Bond) सोबत जोडले आहेत.

| रक्कम | स्टॅम्प पेपर रु. |
|---|---|
| रक्कम रु.१,०००/- पर्यंत | निरंक (सोबत जाडलेले हमिपत्र वापरावे.) |
| रक्कम रु.१,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत | २००.०० |
| रक्कम रु.१०,००१/- पासून पुढे | ५००.०० |

**छ) वारसप्रकरणे :-**

वारसप्रकरणाकरिता वारस प्रकरणे धोरणाचा संदर्भ घ्यावा.

**ज) निष्क्रिय (In-Operative / Dormant) खात्यांचे बाबतीत :-**

१) ज्या सेव्हिंग्ज किंवा चालू ठेव खाते मध्ये २ वर्षे ग्राहकाने केलेले (Customer Induced) अथवा इतर व्यक्तीने ग्राहकाच्या खात्यावर केलेले (Third Party Induced) (Debit/Credit) व्यवहार झालेले नाहीत अशा खात्यांना In-Operative समजली जातील व CBS मध्ये अशा खात्यांना In-Operative मार्किंग केले जाईल.

Karad Urban Co.op. Bank Ltd. Head Code No. 0 Scheduled Bank

उदा-

| Particular | Example |
|---|---|
| Customer Induced | Cash withdrawal or Deposit,<br>Interest on FD Crediting to Saving A/c as per mandatet |
| Third Party Induced | Amount Deposited By Third Party In Account |
| Customer Not Induced | Bank Charges, Saving Interest Credited. |

- निष्क्रिय खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.
- निष्क्रिय खात्याच्या खातेदाकडून योग्य प्रतिक्रिया मिळाल्यास असे खाते आणखी १ वर्ष सक्रीय म्हणून गृहीत धरावे.

२) In-Operative खाते Operative करणेचे अधिकार शाखधिकारी यांना राहतील. खाते Operative करताना In-Operative होण्याचे कारणाबाबत शाखाधिकारी यांनी माहिती घेऊन त्याप्रमाणे ग्राहकांचा अर्ज घेतलेनंतर KYC संबंधी दस्तऐवज बाबतची पुर्तता आणि अजीव खाते Operate न करण्यामागचे कारण नमूद करून खाते Operative करणेचे आहे.
तसेच ज्या सेव्हिंग्ज किंवा चालू खात्यामध्ये १ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता व्यवहार नाहीत त्या खातेदारांशी जास्तीत जास्त संपर्क साधून त्यांच्या व्यवहार न करण्याच्या अडचणी समजून घेवून खात्यामध्ये व्यवहार करण्यासाठी प्रवृत्त करावे. संबंधित खातेदाराशी संपर्क साधल्याची तारीख, खातेदाराचे मिळालेले उत्तर अथवा संपर्क न झाल्यास त्या संबंधीची माहिती यांची शाखांनी Excel Sheet - रजिस्टरमध्ये नोंद ठेवावी.

३) खाते निष्क्रीय झालेनंतर प्रत्येक तिमाहीस खातेदारास SMS द्वारे सूचित करुन, खात्यांवर व्यवहार करण्यासाठी आवाहन करणेचे आहे.

४) खाते In-operative वरुन Operative झालेनंतर खातेदारास SMS करण्यात येईल.

**खाते सक्रिय करताना (Account Status from Inoperative/Dormant to Operative)**

- कोणत्याही प्रकारचे बचत किंवा चालू ठेव खाते सक्रिय करताना ठेव धोरणानुसार ग्राहकांकडून एक पानी फॉर्म भरुन घेणेचे आहे याची सर्वांना कल्पना आहे.
- या बरोबरच ठेव धोरणामध्ये झालेला बदल असा की., ज्या दिवशी बचत/चालू ठेव खाते सक्रिय होईल त्यामध्ये केवळ रोखीनेच किमान रु.१००/- जमा रक्कमेचा व्यवहार गरजेचे राहील.
- रोखीने किमान रु.१००/- जमा घेतले नसल्यास बचत/चालू ठेव खाते चुकीच्या पद्धतीने सक्रिय केलेले आहे तसे ग्राह्य धरले जाईल आणि संबंधित शाखेला समज दिली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**५) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे DEAF मध्ये पाठविण्यात येणाऱ्या Unclaimed खात्यांच्या बाबतीत:-**
याबाबतची कार्यवाही Annexure V प्रमाणे करणेची आहे.

**६) सर्व प्रकारच्या ठेव (Savings Account, Current Account, Term Deposit, CTD, etc.)- खातेंसाठी कालावधी खालीलप्रमाणे राहतील.**

- New account Period- CBS मध्ये सदरचे Field नवीन खाते सुरु केलेपासून किती दिवसांपर्यत खाते बंद झालेस सदर खाते संशयास्पद ठरविले जाईल याबाबतचे असून त्यासाठी New account Period हा ३० दिवस राहील.
- Inoperative/Dormant Period - Savings व Current खातेंसाठी सदरचा कालावधी हा ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून (Customer induced transaction) २ वर्षे राहील. म्हणजेच ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून २ वर्षानंतर सदरचे खाते Inoperative/Dormant ठरविले जाईल.

- Unclaimed Period - Savings व Current खातेंसाठी सदरचा कालावधी हा ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून (Customer induced transaction) १० वर्षे राहील. म्हणजेच ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून १० वर्षानंतर सदरचे खाते Unclaimed ठरविले जाईल. तसेच मुदत ठेव, CTD ठेवीसाठी खात्याची मुदत संपलेनंतर १० वर्षे राहील.

**झ) अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर-**

१) अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर, ठेवीदाराने Re-KYC ची पूर्तता करेपर्यंत खात्यांचे Debit Transaction Freeze करण्यात येतील. तसेच खात्यावरील शिल्लक रक्कमेची खात्री केल्या संबंधितील पत्र शाखेने ठेवीदारांकडून घ्यावे.

२) Little Champ Savings Scheme मधील ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर या कॅटेगरीमधील त्यांचे खाते बंद करण्यात येईल व के.वाय.सी. ची पुर्तता करून सर्वसाधारण बचत खाते उघडण्यात येईल.

**ट) सर्व ठेवींची रक्कम मिळून ठेवीची रक्कम रोख अदा करणेबाबत -**

१) रक्कम अदा करताना, जर बचत व चालूठेव वगळता खातेदारांची संबंधित दिवसाची शिल्लक रक्कम रू.२०,०००/- व रू.२०,०००/- पेक्षा जास्त असेल, तर खातेदारास रोख स्वरूपात रक्कम अदा करता येणार नाही. (उदा-खातेदारांची एकूण ठेव रू.५०,०००/- आहे. परिपक्व ठेव व त्यावरील देय व्याज देय रक्कम रू.५,०००/- इतकी आहे. तरीही खातेदाराला रोख स्वरूपात रक्कम अदा करता येणार नाही.)

२) संबंधित दिवसाची बचत व चालूठेव वगळता शिल्लक रक्कम रू.२०,०००/- पेक्षा कमी असेल तर खातेदारास रोख स्वरूपात रक्कम अदा करता येईल.

**ठ) अंगठेधारक खातेदारांच्या व्यवहाराबाबत-**

अंगठेधारक खातेदारांची चालूठेव खाती उघडणेची नाहीत. अशा खातेदारांच्या सेव्हिंग्ज खात्याला चेकबुकची सोय उपलब्ध होणार नाही. अंगठेधारकांच्या खात्यांमध्ये व्यवहाराची जोखीम लक्षता घेता अंगठेधारक खातेदारास सेव्हिंग ठेव खात्यामधून एका दिवसात रोख रक्कम रू.१०,०००/- पर्यंतच विड्रॉवल स्लिपने अदा करणेचे आहेत. मात्र अपवादात्मक परिस्थितीत शाखेच्या सेवकांनी (Officer, Asst. Manager, Manager) यांनी जर अंगठा बांधून दिलेला असेल तर रोख रक्कम रू.१०,०००/- पेक्षा जादा रक्कम अदा करता येईल. खातेदारास रक्कम अदा करताना खातेदाराचे पासबुक तसेच ओळखपत्र तपासूनच रक्कम अदा करणेची आहे. तसेच अशाप्रकारे RTGS / NEFT चे व्यवहारही करता येतील. खातेदारा व्यतिरिक्त (Third Party Payment) विड्रॉवल स्लिपने रक्कम अदा करू नये.

**१०) स्थायी सूचना (Standing Instructions) बाबत -**

ज्या ग्राहकांनी त्यांचे CTD खातेची तसेच कर्जखात्याची रक्कम त्यांचे SA/CA/CC मधून वर्ग करणेस सांगितले आहे अशा रक्कमा शाखेकडून Manually चलन करून सदर खाती जमा केले जात आहेत. याबाबत CBS प्रणाली मधील Standing Instructions या Option मध्ये योग्य ती माहिती भरल्यास सदर माहितीप्रमाणे रक्कम ग्राहकाचे कर्ज खाते तसेच CTD खाती जमा होईल. याबाबत खातेदाराकडून फॉर्म भरून घ्यावयाचा असून त्याचा नमुना सोबत जोडलेला आहे.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office
Code No. 0
Scheduled Bank

**११) चेकबुक आकार :-**

खातेदारास नवीन खाते उघडतेवेळी चेकबुकची आवश्यकता असलेस पहिले चेकबुक विनामुल्य मिळेल, त्यानंतर मात्र बचत खात्यासाठी, चालू ठेव खात्यास व कॅश क्रेडीट खात्यास चेकबुक चार्जेसची आकारणी केली जाईल. सविस्तर माहिती सेवा शुल्काच्या परिपत्रकामध्ये दिलेली आहे. प्रचलित पध्दतीनुसार वैयक्तिक खातेदाराचे चेकबुक व खातेदाराचे नाव लिहून मल्टीसिटी/पेअेबल ॲट पार चेक देण्यात येईल, चेकबुक चार्जेस ठरवणेचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील. चेकबुकबाबत सवलत देण्याचे अधिकार मा.उपमहाव्यवस्थापक/महाव्यवस्थापक (हिशोब विभाग)/मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

**१२) आनुषंगिक शुल्क (Incidential Charges) बाबत –**

Incidential Charges प्रत्येक तिमाहीस जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च अखेरील चार्जेस हे सेवा शुल्क परिपत्रकानुसार खातेस ॲव्हरेज बॅलन्स न राखलेस माहे जुलै, ऑक्टोबर, जानेवारी व एप्रिलमध्ये खातेस नावे टाकले जातील. Incidental Charges नावे टाकण्याच्या एक महिना आधी ग्राहकांना SMS ने कळविणेत येईल व नंतर Quarterly Average Balance Maintain न झाल्यास Charges नावे टाकले जातील. सेवकांच्या सेव्हिंग्ज खात्यांना, बेसीक सेव्हिंग्ज खात्यांना तसेच २ वर्षे वरील व्यवहार नसणारी Inoperative खात्यांना Charges Debit केले जाणार नाहीत. Operative परंतु, "Zero" balance असणाऱ्या खात्यांचे Charges, Pending म्हणून नावे टाकली जातील. तसेच Charges नावे टाकण्या इतपत Balance नसल्यास तेथे शिल्लक असणारी रक्कम नावे टाकून उर्वरीत रक्कम Balance झालेनंतर नावे टाकली जातील. Quarterly Average Balance चे Calculation Daily Product Basis वर केले जाईल.

सेवा शुल्क तसेच कमीशनमध्ये (Incidental शुल्क, NEFT/RTGS/DD/PO शुल्क, ICC/OCC कमीशन, Inter Branch व्यवहार शुल्क) सवलत/माफी देण्याचे अधिकार मा.उपमहाव्यवस्थापक/महाव्यवस्थापक (हिशोब विभाग) / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

**१३) व्हाऊचर पासिंग मर्यादाबाबत**

ज्या शाखेमध्ये ग्राहकाचे बचत खाते आहे अशा शाखेमधून रोख रक्कम काढत असताना ग्राहक स्वत: आलेस रक्कम रू.५,००,०००/- पर्यंतच विड्रॉल चलनाने रक्कम अदा करणेची आहे. इतर शाखांमध्ये बचत ठेव खातेदाराला विड्रॉल चलनाने रोख रक्कम काढता येणार नाही. खातेदाराव्यतिरिक्त (Third Party) रक्कम विड्रॉल चलनाने अदा करू नये.

**१४) रू.५ लाख व त्यावरील रोखीचे व्यवहारांबाबत –**

कोणत्याही प्रकारच्या खात्यांमध्ये (ठेवी व कर्ज) एकरक्कमी रू.५ लाख व त्यावरील कॅश भरणा व विड्रॉवल बाबतचा रिपोर्ट शाखाधिकारी यांनी दर १५ दिवसांनी (१ ते १५, १६ ते ३०) सी.बी.एस. सिस्टीममधून काढणेचा आहे व सदरचे PDF Report File सन २०२६-२७ आर्थिक वर्षाचा फोल्डर करून यामध्ये Save करणेचे आहेत. (सदरच्या रिपोर्टमध्ये खातेदाराचे नाव, खाते नंबर, डिपॉझीट रक्कम, विड्रॉवल रक्कम, Benificiary चे नाव इ. माहिती असेल)

**१५) शाखांतर्गत व्यवहारासाठी नियमावली –**

बँकेने CBS प्रणाली कार्यान्वीत केली आहे. CBS प्रणालीमध्ये शाखांतर्गत व्यवहारासाठी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असून सदर नियमावली 'Annexure VI' तसेच शाखाअंतर्गत (Branch to Branch) रोख भरणा करणेबाबतची प्रक्रिया 'Annexure VII' मध्ये दिलेली आहे.

Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

१६) **Account Closure Charges**

चालू अथवा बचत खाते बंद केल्यास सेवा शुल्काच्या परिपत्रकाप्रमाणे Account Closure Charge आकारले जातील. हे नियम अनिवासी खात्यांसाठी सुध्दा लागू राहतील.

**अपवाद–**

१) मयत खातेदाराची रक्कम वारसास अदा करताना Account Closure Charges आकारले जाणार नाहीत.

२) Inter Branch खाते ट्रान्सफर करताना Account Closure Charges आकारले जाणार नाहीत.

३) खातेदाराचे आपल्या बँकेतील दुसरे बचत अथवा चालू खाते चालू असल्यास Account Closure Charges आकारले जाणार नाहीत.

ठेव धोरणामध्ये बँकेच्या आवश्यकतेनुसार बदल करणेचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील. तसेच वरील ठेव धोरणाव्यतिरिक्त रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठेव धोरणाबाबत/ठेवींबाबत सुचविलेले बदल, सूचना बंधनकारक राहतील.

Ngosavi
**उपमहाव्यवस्थापक**
**(हिशोब विभाग)**

The Karad Urban Co-op. Bank Ltd; Head Office
Code No. 0
Scheduled Bank

Shingate
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

## Annexure I – बेसीक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते :–

१. बेसीक सेव्हिंग बँक खाते उघडण्याची सुविधा ग्राहकांना राहील.

२. सदर खाते उघडताना कमीत कमी शिल्लक रक्कमेची अट राहणार नाही.

३. विनाशुल्क सेवा –

- आपल्या बँकेच्या ATM द्वारे पैसे काढणे. (As per Specified Limit)
- Local Clearing चेक्स जमा करणेसाठी कोणत्याही प्रकारचे चार्जेस राहणार नाहीत.
- सदर खात्यावरील चेक रिटर्न आल्यास सदर खात्यास चेक रिटर्न चार्जेस राहणार नाहीत.
- अशा खात्यांवर व्यवहार होत नसले तरी Non Operation / Activation तसेच Incidential Charges, घेतले जाणार नाहीत.

४. **रक्कम भरणे व काढणेबाबत–**

१. सदर खात्यात एका महिन्यात जास्तीत जास्त रू.१०,०००/– पर्यंत रक्कम नावे देता येईल व एका आर्थिक वर्षात रू.१,००,०००/–पर्यंत रक्कम जमा घेता येईल.

२. Specified Limit - सदर खात्यातून एका महिन्यात जास्तीत जास्त ४ वेळा रक्कम (ATM/RTGS/NEFT/Clearing/ शाखेतून रोख कॅश काढणे/Transfer/Standing Instruction/EMI इ. अशा एकत्रीत स्वरूपात) विनाशुल्क काढता येतील.

३. DEPOSIT- Small Deposit account नियमाप्रमाणे खात्यामध्ये जास्तीत जास्त शिल्लक रक्कम रू.५०,०००/– पर्यंत ठेवता येईल. सदर Deposit ठेवताना Savings ठेव Balance व Deposit Balance रू.१,००,०००/– चे वर जाणार नाही याची काळजी घ्यावी.

४. सदर खातेदारास त्याचे मुदत ठेव, स्वल्पसंचय ठेव, सोनेतारणावर जास्तीत जास्त रू.५०,०००/– कर्ज देता येईल.

५. चेकबुक – सदर खात्यावर फक्त Withdrawal व ATM द्वारे व्यवहार करता येतील. सदर खातेदारांना चेकबुकची सुविधा देता येणार नाही.

६. सदर खातेदारास सर्व शाखा मिळून (Bank as whole) फक्त एकच सेव्हिंग्ज खाते उघडता येईल.

७. ज्या ग्राहकांची अशी खाती उघडली आहेत. त्यांची दुसरी बचत खाती आपल्या बँकेत असू नयेत. जर अशा ग्राहकांची एकापेक्षा जास्त बचत खाती आपल्या बँकेत असतील तर त्यांनी ती Basic Savings Bank Deposit Account उघडल्यापासून ३० दिवसाच्या आत बंद करावयाची आहे.

Basic Savings Bank Deposit Account ओपन करताना खातेदाराची के.वाय.सी. पूर्तता करणेची आहे. खातेदाराची के.वाय.सी. अपूर्ण असेल तर त्यास ओळखदाराची (Introducer) संपूर्ण पूर्तता होणे आवश्यक आहे.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

**Annexure II - CBS सिस्टीममध्ये Fixed Deposits (401), Pension Deposit (405) व RIS (410) यांचे Auto Renewal Facility बाबत.**

शाखा आणि ग्राहकांच्या मागणीनुसार मुदत ठेव (४०१), पेन्शन ठेव (४०५) व पुनर्गुंतवणूक ठेव (४१०) यांचे Auto Renewal Facility बाबत –

१) Auto Renewal Facility ही फक्त Fixed Deposits (401), Pension Deposit (405) व RIS (410) या GL साठीच लागू आहे.

२) FD Account Auto Renewal Marking
   a) FD Account Open करुन Voucher Entry मारताना Auto Renewal Details येथे Mark करणे.
   b) या Option मध्ये Renewal Period हा month /days हा auto येईल. तो disable असेल त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३) FD Auto Renewal मुदत ठेव पावती रक्कमेबाबत.
   a) ज्या मुदत ठेव/ पेन्शन ठेव पावतीचे व्याज FD & Pension Interest Payble खाती जमा होणार आहे, म्हणजेच खातेदार मुदतीनंतर व्याजासह रक्कम घेणार आहे. ती ठेव पावती Auto Renewal केलेनंतर नवीन ठेव पावती व्याजासह होईल.
   b) ज्या मुदत ठेव पावतीचे व्याज SA/CA/CC/LN खाती जमा होणार आहे त्या ठेव पावत्या मुदतीनंतर Principal रक्कमेने Auto Renewal होतील.
   c) Auto Renewal FD & Pension ठेवीचे व्याज रोख देता येणार नाही.
   d) RIS ठेव पावत्या ह्या Maturity Amount वर Auto Renewal होतील.
   e) शाखांनी ज्या ठेव खात्यांना Auto Renewal Mark केलेला आहे. त्या ठेव पावती खाली दोन Number (Multiple) Deposit open करु नये.

४) **व्याजदर –**
ठेव पावती ज्या कालावधीसाठी ठेवली आहे त्या कालावधीतच मुदत संपल्यानंतर त्या वेळी जो व्याजदर असले तो व्याजदर लागू राहील.

**महत्त्वाचे मुद्दे –**

१) ठेवीदाराने ज्या कालावधीसाठी मुदत ठेव पावती ठेवलेली आहे. त्याच कालावधीसाठी लागू असणाऱ्या व्याज दराप्रमाणे पावती Auto Renewal होईल.
उदा. पावतीचे मुदत १८० दिवसाची असेल तर Auto Renewal करताना Auto Period १८० दिवस एवढाच येईल.

**Auto Renewal करताना ठेवीच्या कालावधीमध्ये कोणताही प्रकारचा बदल होणार नाही.**

२) Auto Renewal मध्ये मुदत ठेव फॉर्मवरील माहिती मुदत ठेव फॉर्मचे **कॉलम नं.६** मध्ये भरणे.

३) "Auto Renewal" Rubber Stamp हा FD Receipt व Account Opening Form वर मारणे.

The Karad Urban Co-op. Bank Ltd., Head Office Code No. 0 Scheduled Bank

४) FD Receipt च्या मागील बाजूस ५ वेळा A/c Renewal ची नोंद करण्याची सोय आहे. त्यामुळे आपण ४ वेळा FD Account Renewal चा Parameter set केला आहे. म्हणजेच System मधून एक खाते जास्तीत जास्त चार वेळा Auto Renewal होईल.

५) Auto Renewal Mark A/c ला केलेनंतर त्यास कोणताही बदल करता येत नाही. नजरचुकीने Auto Mark झाला असेल तर सदरचे खाते बंद करावे.

६) Auto Renewal FD चे Printing Status हे मुळ ठेव पावतीला जे असेल ते Continue राहील.

७) Reports -

Reports >> >> Manager Overview Report >> >> A/c Open Closer Register Deposit Option मध्ये All, New Deposit & Renewal Deposit असे तीन ऑप्शन आहेत.

All :- Auto Renewal Marking + Regular A/c (ज्या खात्यांना Auto Renewal Marking नाही)

New Deposit :- Regular A/c (ज्या खात्यांना Auto Renewal Marking नाही)

Renewal Deposit:- All Renewal A/c (जी A/c Auto Renewal Marking केल्यानंतर Auto Renewal झाले आहे त्याचा Report)

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

**Annexure III – अर्बन टॅक्स सेव्हींग्ज डिपॉझिट व कुटुंबप्रमुख टॅक्स सेव्हींग्ज डिपॉझिट स्किमबाबत**

''अर्बन टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट स्किम'' व 'कुटुंबप्रमुख टॅक्स सेव्हिंग्ज डिपॉझिट स्किम'' या दोन ठेव योजना दि.०१.०९.२००६ पासून सुरू आहेत. सदरच्या योजनेची नियमावली शासनाने जाहीर केलेल्या निकषांप्रमाणे आहे. त्यानुसार उपरोक्त ठेव योजनेची नियमावली खालीलप्रमाणे –

A. सदरच्या ठेव योजनेअंतर्गत ठेवण्यात येणाऱ्या ठेवींची रक्कम आयकर कायदा कलम ८० सी नुसार करपात्र उत्पन्नातून वजावट मिळण्यास पात्र आहे.

B. **कालावधी :–**

मुदत ठेवीचा कालावधी ५ वर्षे राहील. मुदत ठेवीचा कालावधी पूर्ण होण्याआधी ठेव मोडता येणार नाही. तसेच सदरची मुदत ठेव कोणत्याही कर्जासाठी तारण घेता येणार नाही किंवा या पावतीवर मुदत ठेव कर्ज देता येणार नाही.

C. **गुंतवणूक मर्यादा :–**

सदर मुदत ठेवीअंतर्गत गुंतवणूक रू. १००/– वा त्यापटीत राहील. किमान गुंतवणूक रू.१००/– व दरसाल कमाल मर्यादा रक्कम रू.१.५० लाख इतकी असणार आहे. परंतू गुंतवणुकीकरिता आयकर वजावट लाभ हा आयकर कायद्यानुसार मिळेल.

D. **व्याजावरील आयकर :–**

ठेवीच्या व्याजावरील आयकर कपात प्रचलित नियमानुसार करावयाची आहे.

E. **जॉईंट होल्डर /आयकर वजावट :–**

सदर मुदत ठेवीसाठी जॉईंट होल्डर असण्याची सुविधा देता येईल. जॉईंट होल्डर हा अज्ञानही असू शकतो. मुदत ठेव दोन्ही जॉईंट होल्डर पैकी कोणा एकास वा हयात असणाऱ्यास देय असणार आहे. कलम ८० सी खालील वजावट मात्र पहिल्या होल्डरलाच मिळू शकेल.

F. **ठेव पावतीवरील मजकूर :–**

ठेव पावतीवर सध्याचे माहिती व्यतिरिक्त ''ठेवीदाराचा पॅन क्रमांक व सदरची ठेव आयकर कायदा कलम ८० सी अंतर्गत वजावटीस पात्र'' असे नमूद करणे आवश्यक आहे.

G. **अन्य बाबी :–**

अकौंट ओपनिंगमध्ये पॅन क्रमांक भरणे गरजेचे आहे. तसेच सदरचा पॅन क्रमांक कॅपिटल अक्षरामध्ये देण्याचा असून सदरचा पॅन क्रमांक पावतीवर व अकौंट ओपनिंग फॉर्मवर हाताने लिहिण्याचा आहे. ग्राहकांने पॅन क्रमांक दिल्याशिवाय मुदत ठेव पावती देऊ नये.

H. या योजनेअंतर्गत सेवकांना जादा व्याजदराचा लाभ देता येणार नाही.

I. मुदत ठेव खातेदार व्यक्ती मयत झालेस याबाबत आयकर खात्यास कळविण्याची जबाबदारी ही सर्वस्वी ठेवीदाराच्या वारसाची राहील. सदर मृत ठेवीदाराचे ठेवीची रक्कम त्याचे कायदेशीर वारसास परत देण्यात येईल.

या ठेव योजनांखाली खाते उघडताना रक्कम रू.१००/– किंवा त्या पटीत आहे, रक्कम रू.१.५० लाखापेक्षा जास्त नाही, तसेच कालावधी ५ वर्ष आहे, याबाबत विशेष दक्षता घ्यावी. एकदा भरलेला डेटा हा एडीट करून भरता येत नाही. तसेच जरी डेटा चुकीचा भरला गेला तर सदरचे खाते नियमानुसार बंद करता येत नाही. त्यामुळे या योजनेअंतर्गत सुरू होणाऱ्या खात्यांची माहिती संगणकावर अत्यंत काळजीपूर्वक व अचूक भरावी. जर एखादी पावती नजरचुकीने

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Scheduled Bank Head Office

चुकीची ओपन झाल्यास याबाबत मुख्य कार्यालयाशी पत्राद्वारे संपर्क साधून कार्यवाही करणेची आहे व याबाबतचे अधिकार महाव्यवस्थापक (हिशोब विभाग)/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

या योजनेमधील खाते बंद करणे किंवा ट्रान्सफर करणे हे फक्त मॅनेजर लेव्हलने करणेचे असून त्याचे रेकॉर्ड ठेवणेचे आहे. या योजनेतील सर्व मुदत ठेवींच्या बाबतीत अकौंट ओपनिंगची प्रिंट कायमस्वरूपी अकौंट ओपनिंग फॉर्मला जोडण्याची आहे.

सदरच्या जी. एल. मध्ये ओपन होणाऱ्या अकौंट ओपनिंगच्या फॉर्मवर खालीलप्रमाणे शिक्का उमटवावा.

> या योजनेमध्ये ठेवलेल्या ठेवींची एकूण रक्कम जर एका आर्थिक वर्षात रू.१.५० लाखापेक्षा जास्त झाल्यास जादा रक्कम ही बँकेच्या अन्य ठेव प्रकारामध्ये वर्ग करण्यास माझी संमती आहे.
>
> पॅन नंबर : खातेदारांची सही

सदर योजनेस मा.संचालक मंडळ वेळोवेळी ठरवतील त्याप्रमाणे व्याजदर लागू राहतील.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office
Code No. 0
Scheduled Bank

**Annexure IV – व्याजातून आयकर कपातीबाबत.**

आयकर विभागास पाठविण्यात येणाऱ्या Form 121 व Forms 97/98 बाबत.

आयकर कपात होऊ नये म्हणून घेतलेल्या 121 Forms बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे-

१) **Form 121 बाबत –**

- Form 121 हा नवीन स्वयंघोषणा अर्ज आहे, जो आयकर कायदा २०२५ च्या कलम ३९३ (६) अंतर्गत १ एप्रिल २०२६ पासून लागू झाला असून, Form 15G/Form 15H ऐवजी एकच Form 121 घ्यायचा आहे. याचा उपयोग व्यक्तिद्वारे त्यांचे अंदाजित वार्षिक उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असल्याचे घोषित करण्यासाठी केला जातो, जेणेकरून व्याज, किंवा इतर देयकांवर कोणताही टीडीएस कापला जाणार नाही याची खात्री होते. ठेवीदाराने Form 121 चे Part - A मध्ये घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.
- Old Tax Regime (जुनी कर प्रणाली) प्रमाणे एका आर्थिक वर्षात ठेवीवरील व्याजाची (व्याज व इतर उत्पन्न), ६० वर्षाच्या आतील ग्राहक, Trust, HUF यांसाठी रु.२,५०,०००/-, जेष्ठ नागरिकास रु.३,००,०००/- व वरिष्ठ जेष्ठ नागरिकास रु.५,००,०००/- कमाल मर्यादा आहे.
- New Tax Regime (नवीन कर प्रणाली) प्रमाणे एका आंर्थिक वर्षात ठेवीवरील व्याजाची (व्याज व इतर उत्पन्न), ६० वर्षाच्या आतील ग्राहक, Trust, HUF, जेष्ठ नागरिक व वरिष्ठ जेष्ठ नागरिक या सर्वांसाठी रु.४,००,०००/-, कमाल मर्यादा असून त्याचे उल्लंघन होणार नाही ह्याची काळजी घ्यावी.
- Form 121 हे निवेदन पत्र देणाऱ्या वरिष्ठ नागरिक ठेवीदाराचे संबंधीत चालू वर्षीचे एकूण उत्पन्नावर कर देयता (Tax Liability) निरंक (NIL) असेल अशी निवेदन पत्र देणाऱ्या ठेवीदाराने स्वत:ची खात्री केली पाहिजे.
- Form 121 फक्त वैयक्तीक ठेवीदार, HUF व Trust, ज्येष्ठ नागरीक यांनाच देता येईल. कंपनी आणि फर्म यांना Form 121 देता येणार नाही.

२) **Form 121 मधील अटींचे महत्त्व/गांभीर्य याची खातेदारास जाणीव करून देणे.**

शाखाधिकारी यांनी वरील अटी पूर्ण होतात का याची ठेवीदारांशी चर्चा/रुजवात/खात्री करावी तसेच Form 121 निवेदनपत्र असत्य ठरल्यास किमान ३ महिने कारावास होणेची शिक्षा कायद्यात आहे. याची जाणीव ठेवीदारास करून द्यावी.

३) **Form 121 आयकर खात्याकडे पाठवणे.**

हे निवेदनपत्र ठेव स्वीकारताना किंवा दरवर्षी घेतले जाते. तसेच नवीन मुदतठेव पावती करताना ठेवीदाराच्या उत्पन्नामध्ये बदल होत असलेस, वाढीव उत्पन्नासाठी नवीन 121 चा Form घेणेचा आहे. त्यानंतर दर तिमाहीला मुख्य कार्यालय, टॅक्स सेल मार्फत प्राप्त झालेल्या सर्व माहितीचे एकत्रिकरण करून ऑनलाईन अपलोड केले जाईल.

४) **Form 121 दिला नसेल तर पूर्तता व कार्यवाही.**

ज्या ठेवीदारांकडून Form 121 निवेदनपत्र मिळालेले नाही त्यांना द्यावयाच्या एका वर्षात सर्वसाधारण ग्राहकांसाठी व्याजाची रक्कम रु.५०,०००/- व ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याजाची रक्कम रु.१,००,०००/- पेक्षा जास्त होणार असेल तर नियमानुसार आयकर कपात करावी.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

५) **Form 121 दाखल करणेसाठी PAN आवश्यक –**

दि.०१/०४/२०१० पासुन PAN नंबर अनिवार्य असलेची तरतुद कायद्यात केली आहे. त्यामुळे PAN क्रमांक नसेल तर सदर निवेदनपत्रे स्वीकारु नयेत. अशा बाबतीत २०% दराने आयकर कपात करावी लागेल याची नोंद घेवून अशा सभासद/ग्राहकांना PAN घेणेसाठी प्रवृत्त करावे. जर PAN क्रमांक नसेल व २०% दराने आयकर कपात केली तर अशा खातेदारांना TDS सर्टिफिकेट देता येणार नाही व TDS रक्कम refund मिळणार नाही याबाबत खातेदारांना शाखा व्यवस्थापकांनी कल्पना द्यावी.

❖ **Form 97 / 98 बाबत :-**

**A) आयकर नियम 159 :- PAN नंबर नमूद करणे बाबतचे व्यवहार**

आयकर नियम 159 नुसार खालील व्यवहारांचे बाबतीत रोखीने व्यवहार करणाऱ्याचा PAN/GIR नोंद करून दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. PAN मिळाला नसेल तर PAN मिळणेसाठी केलेल्या अर्जाची पोहोच दप्तरी घ्यावी. पॅन क्रमांक नसेल व अर्ज केला नसेल तर फॉर्म नं.९७ व व्यक्तीचा व्यवसाय फक्त शेती असेल तर फॉर्म नं.९८ मध्ये निवेदनपत्र दोन प्रतीत घ्यावे, तसेच खातेदार अज्ञान असले तर खाली नमुद अ.नं.१ व २ चे बाबतीत त्याचे उत्पन्न करपात्र नसेल तर वडील/आई/पालक यांचा PAN क्रमांक दप्तरी घ्यावा.

| | | |
|---|---|---|
| Rule 159 | १) | एका दिवसात रु.५०,०००/- पेक्षा जास्त रक्कमेची मुदत ठेव स्वीकारणे किंवा एका आर्थिक वर्षात रू.५.०० लाखापेक्षा जास्त रक्कम मुदत ठेव म्हणून स्विकारणे. |
| | २) | बँकेत खाते उघडणे मुदत ठेव खाती सोडून इतर सर्व Current / Savings (BSBD) खात्याशिवाय / Recurring / Cumulative / Small Saving (Pigmy) |
| | ३) | एकाच दिवशी रु.५०,०००/- अथवा अधिक बेरीज होईल इतक्या रक्कमेचे डिमांड ड्राफ्टस् /पे ऑर्डर्स /बँकर्स चेक्स खरेदी करणेसाठी /घेणेसाठी रोख रक्कमेचा भरणा करणे. |
| | ४) | एकाच दिवशी रु.५०,०००/- अथवा अधिक बेरीज होईल इतक्या रक्कमेच्या कोणत्याही ठेव/ कर्ज खात्यावर रोख रक्कमेचा भरणा करणे. |

**B) आयकर नियम 160 :- PAN बाबतची माहिती व पत्रके सादर करणे –**

वरील विभाग ब मधील क्र.१ ते ४ बाबतच्या व्यवहारांचे माहिती-कोष्टक तयार करावे. त्यामध्ये व्यवहार करणाऱ्या व्यक्तिंचे नांव व पत्ता, व्यवहारांचे स्वरूप व व्यवहारांचा दिनांक, प्रत्येक व्यवहाराची रक्कम, PAN क्रमांक ही माहिती अंतर्भूत असावी.

१ एप्रिल ते ३० सप्टेंबर कालावधीसाठीचे माहिती- कोष्टक व मिळालेले फॉर्म ९७, फॉर्म ९८ हे कागदपत्र दि.३१ ऑक्टोंबर पर्यंत आणि १ ऑक्टोंबर ते ३० मार्च कालावधीसाठीचे माहिती- कोष्टक व मिळालेल फॉर्म ९७, व फॉर्म ९८ ही कागदपत्रे दि.३० एप्रिल पर्यंत Director of Income Tax (Investigation) यांचेकडे खालील पत्त्यावर पाठवणेत यावेत.

To,
Director of Income Tax (Investigation),
Income Tax Office, PMT Building,
B Wing, 3rd Floor,
Swargate, Pune - 411037

**टीप:-** वरीलपैकी क्र.२ म्हणजे बँकेत खाते उघडणाऱ्या खातेदाराकडून मिळालेले फॉर्म ९७, फॉर्म ९८ शाखेमध्ये ठेवणेत यावेत, ते आयकर खात्याकडे पाठविणेची आवश्यकता नाही.

**ठेवीवरील व्याजातून आयकर कपात (आयकर कलम ३९३ {Table SI.NO.5 (ii) D (b) } ) –**

एका आर्थिक वर्षात बँकेकडील ग्राहकाच्या सर्व मुदत ठेवीवरील व्याजाची रक्कम रु.५०,०००/- पेक्षा जास्त होत असेल (जेष्ठ नागरिकांसाठी व्याजाची रक्कम रू.१,००,०००/- पेक्षा होत असेल) तर व ग्राहकाने Form 121 दिला नसेल तर व्याज रक्कमेतून १०% दराने आयकर कपात करावी व ग्राहकाने PAN Card चा पुरावा न दिल्यास व्याज रक्कमेतून २०% दराने आयकर कपात करावी.

**ठेवीवरील आयकर कपात सवलतीबाबत :-**

**१) खालील व्यक्ती/ संस्थेचे बाबतीत आयकर कपात करु नये –**

- केंद्र सरकार/राज्य सरकार अगर तत्सम कायद्यानुसार स्थापन झालेल्या वित्त संस्था
- भारतीय जीवन महामंडळ, विमा कंपनी
- विमा व्यवसाय करणारी कंपनी किंवा सहकारी संस्था
- ज्या संस्थेचे उत्पन्न कलम ११ नुसार करमाफ आहे आणि ज्यांना त्यांचे कलम २६३ नुसार उत्पन्नाचे विवरण पत्रक दाखल करावे लागत नाही अशा संस्था

**२) खालील ठेवी/ ठेव खाती बाबतीत आयकर कपात करू नये –**

- Savings Deposit वरील व्याज
- Non - Resident (External) A/c वरील व्याज

The Karad Urban Co-op Bank Ltd; Head Office
Code No 0
Scheduled Bank

**Annexure V - Unclaimed Deposit च्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग करणेबाबत.**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे दि.२७/०५/२०१४ रोजीचे परिपत्रकानुसार बँकांनी चालू / बचत खाती १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता Inoperative असणारी, रिकरींग व मुदत ठेवींच्या बाबतीत मुदत संपलेल्या तारखेपासून १० वर्ष किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या खात्यांच्या (Inoperative A/c's) व्याजासहीत रक्कमा तसेच इतर देणे रक्कमांना १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी होईल अशा रक्कमा व्याजासहीत पुढील महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत "ठेवीदार प्रशिक्षण व जागरूकता निधी योजनेमध्ये" रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करणेच्या आहेत.

**रक्कम वर्ग करणेची पध्दत –**

सदर रक्कमा मुख्य कार्यालयामार्फत रिझर्व्ह बँकेकडे "E kuber (CBS)" व्दारे वर्ग करावयाची आहे. जेव्हा बँका त्यांचेकडील अशा रक्कमा (१० वर्ष पूर्ण झालेल्या) वर्ग करणार असतील तेव्हा त्यांनी त्यांना दिलेला DEAF Code Mention करणे आवश्यक आहे. सदर फॉर्म मध्ये एकूण खात्यांची संख्या व एकत्रीत रक्कम तसेच व्याजास पात्र असलेल्या ठेवी व व्याजास पात्र नसलेल्या ठेवी तसेच इतर रक्कमा (उदा. CC मधील Cr.Balance, Term loan मधील Cr.Balance, अनामत खाती जमा असणाऱ्या रक्कमा इ.) नमुद करणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचा Deaf Code 0567 आहे.

**रिटर्नस् –**

**फॉर्म नं.१ –** बँकेने हे रिटर्न एकत्रीत रक्कम RBI ला वर्ग केली जाईल त्यादिवशी पाठविणेची आहे हे सादर करताना एकूण रक्कमेपैकी व्याज देण्यास पात्र खाती व रक्कम, व्याजास अपात्र खाती व रक्कम, व इतर जमा रक्कम अशा पध्दतीने माहिती पाठवावी. हे रिटर्न एकत्रीत पाठविले असले तरी बँकेने खातेदाराचे नाव, खाते नंबर, रक्कम तसेच त्यावरील होणारे व्याज, रक्कम वर्ग केल्याची तारीख इ. तसेच तद्संबंधी इतर अनुषंगिक कागदपत्रे याचे बँकेने रेकॉर्ड ठेवणेचे आहे.

**फॉर्म नं.२ –** जेव्हा ग्राहक Unclaimed खात्याची मागणी करतो, तेव्हा त्या खात्याची मागणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे फॉर्म नं.२ प्रमाणे E-kuber द्वारे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत करावी लागते आणि २५ तारखेपर्यंत Hard copy पाठवावी लागते.

बँकेने Claim खात्यांचे रेकॉर्ड खालीलप्रमाणे ठेवण्याचे आहे.

१) खातेदाराचे नाव
२) खात्याचा प्रकार
३) फंडास रक्कम वर्ग केल्याची तारीख व रक्कम
४) खातेदारास रक्कम परत केल्याची तारीख व रक्कम
५) फंडाकडून मागणी केलेला व्याजदर

**फॉर्म नं.३ –** DEAF चे सहामाही प्रमाणपत्र वैधानिक लेखापरिक्षकांकडून तपासून घेणेचे आहे.

**ऑडीट:–**

बँका ज्या दिवशी रक्कम DEAF फंडात वर्ग करणार आहेत, त्यावेळी बँकेने प्रत्येक खातेदाराची स्वतंत्र माहिती ठेवणे आवश्यक आहे. सदरचे खाते व रक्कम बँकेचे अंतर्गत ऑडीटर यांचेकडून तपासून घेणे आवश्यक आहे. DEAF A/c ला रक्कम वर्ग करेपर्यंत होणारे व्याज खातेदाराच्या खाती जमा करणे आवश्यक असुन ते ऑडीटर यांचेकडून तपासून घेणेचे आहे.

तसेच RBI ला पाठविण्यात येणारी सर्व रिटर्न वेळेत व अचुक पाठविल्याचे प्रमाणपत्र वैधानिक लेखापरिक्षकांकडून वार्षिक घेवून RBI ला पाठविण्याचे आहे.

Disclosure in Notes to Accounts –

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियांच्या DEAF A/c मध्ये वर्ग केलेल्या रक्कमा "Contingent Liability – other, items for which the bank is Contingently liable" या नावाने Schedule -12 मध्ये बँकेच्या वार्षिक ताळेबंदात दाखवणे आवश्यक आहे. तसेच Notes to Accounts मध्ये सुध्दा RBI ने दिलेल्या Format मध्ये माहिती दाखविणेची आहे.

**व्याजदर :–**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सुचनेनूसार व्याजास पात्र असणाऱ्या ठेवींसाठी (सेव्हिंग्ज व मुदत ठेवी) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या व्याजदरानुसार (सद्याचा लागू असणारा व्याजदर ३.००%) रक्कम रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करावयाची आहे. सदर व्याज रक्कम सेव्हिंग्ज ठेव खातेंसाठी शेवटचे व्याज पोस्टींग केलेल्या तारखेपासून ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे रक्कम वर्ग करणाऱ्या तारखेपर्यंत व मुदत ठेवीसाठी मुदत संपलेल्या तारखेपासून ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे रक्कम वर्ग करणेच्या तारखेपर्यंत याप्रमाणे Calculate करणेची आहे.

CBS System मधून खात्यांची माहिती काढताना शाखांनी खालीलप्रमाणे Path वापरावा.

Path- Reports >> General Report >> RBI Unclaimed Deposit Register

हिशोब विभागाकडून Consolidate Return तयार करून रक्कम रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करणेत येईल.

**Unclaimed Deposit बाबत व्यवहाराची कार्यपध्दती**

१) Unclaimed Deposit ची रक्कम A/c Type प्रमाणे ज्या त्या GL ला जमा-नावे होणेसाठी CBS System मध्ये Unclaimed Deposit Saving, Current, All FD Schemes, All Payable, All Interest ची नवीन GL व PL Open करणेत आलेली आहेत.

२) Unclaimed Deposit साठी CBS System द्वारे Auto Programme झाल्याने, १० किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या खात्यांचा रक्कमेचा जमाखर्च सदर GL ला होवून Unclaime Deposit RBI Suspense खाती जमा होवून रिझर्व्ह बँकेला E Kuber (CBS) द्वारे पाठविणेत येईल.

३) तसेच Claim झालेल्या खात्यांच्या जमाखर्च Unclaimed Deposit amount receivable खाती येणे म्हणून दाखविला जाईल.

४) ज्या ग्राहकाची खाती Unclaimed मध्ये जातील त्यांचा Customer ID मुख्य कार्यालयातून Freeze करणेत येतील.

५) RBI चे दि.०७/०६/२०१८ चे RBI/2017-2018/191 DBR-DEA Fund Cell BC.No.110/30.01.002/2017-18 या परिपत्रकाप्रमाणे व्याज Calculation रक्कम RBI वर्ग करणेच्या तारखेअखेर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या व्याजदरानुसार (सद्याचा लागू असणारा व्याजदर ३.००%) सेव्हिंग ठेव Last Interest Payment Date पासून व मुदत ठेवीची मुदत संपले तारखेपासून व्याज Calculate करणेत येईल.

६) चालु ठेव खाती व्याज देणेत येणार नाही.

७) शाखांच्या ताळेबंद पत्रकामध्ये Contingent Liability/ Contingent Assets अंतर्गत संबंधीत GL मधील वर्ग केलेली रक्कम, येणे व्याज रक्कम (Claim केलेल्या रक्कमा वगळता) दाखविली जाईल व त्याप्रमाणे शाखांनी संबंधीत ठेवीचे GL चे Balance Book Tally करणेचे आहे.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

**Unclaimed Deposit बाबतीत शाखांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे –**

१) CBS System मधून Generate होणाऱ्या दरमहाच्या याद्या अंतर्गत लेखापरिक्षक यांना सादर करून Unclaimed Deposit व Claimed Deposit च्या याद्या त्यांच्याकडून तपासून घेणेच्या आहेत व त्यांचेकडून अंतर्गत लेखापरिक्षक यांना मुख्य कार्यालयाने कळविलेल्या नमुन्यामध्ये Certificate घेणेचे आहे. तसेच सदरच्या Certify याद्या व Certificate ची झेरॉक्स प्रत शाखेत रेकॉर्ड ठेवून मुळ प्रत मुख्य कार्यालय ऑडीट विभागास पुढील महिन्याच्या सात तारखेपर्यंत पाठविणेची आहे.

२) शाखांनी शाखेतील Unclaimed Deposit च्या दरमहाच्या याद्या व Unclaimed Deposit मधील Claim झालेल्या ठेवींच्या याद्या यांचे रेकॉर्ड दरमहा स्वतंत्रपणे ठेवणेचे आहे.

३) Unclaimed खातेंची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठविलेनंतर खाते Operative करणेची/Unclaimed खात्यांमधील रक्कमांची खातेदाराने मागणी केल्यानंतरची पध्दत खालीलप्रमाणे –

- खातेदार सदर रक्कमांची मागणी करणेस आलेनंतर खातेदाराकडून खाते Unclaim झालेचे कारणासह रक्कम मिळणेबाबत/खाते Operative करणेबाबत अर्ज घेणे, खातेदाराची KYC पूर्तता घेणे व KYC Documents मुळ कागदपत्रांबाबत Verify करणे.
- शाखेने खातेदाराचे अर्जाची प्रत, Verify केलेल्या KYC Documents च्या झेरॉक्स प्रती, खातेदाराचा सध्याचा फोटो, खाते पासबूक/मुदत ठेव पावतीची मुळ प्रत शाखेमध्ये व्यवस्थित जतन करून ठेवणे व त्यानंतर खाते Operative करणे तसेच Documents ऑडीट वेळी उपलब्ध करून देणे. वरील कागदपत्रांची पूर्तता झालेशिवाय खाते Operative करणेचे नाही.
- मुदत ठेव खातेंचे बाबतीत रक्कम अदा करताना/मुदत ठेव पावती नुतनीकरण करताना रिझर्व्ह बँकेकडे रक्कम पाठविलेल्या तारखेपासून रक्कम अदा/नुतनीकरण तारखेपर्यंत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या व्याजदरानुसार (सद्याचा लागू असणारा व्याजदर ३.००%) व्याज आकारणी करून एकत्रीत रक्कम अदा/नुतनीकरण करणेची आहे.

  १) दहा वर्ष व दहा वर्षावरील Unclaimed ठेवींची यादी CBS Department ने दर सहामाही बँकेच्या वेबसाईटवर अपडेट करणेची आहे.

  २) दहा वर्ष व दहा वर्षावरील Unclaimed ठेवींच्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग केल्याबाबत शाखा नोटीस बोर्डवर प्रदर्शित करावे.

  वरीलप्रमाणे दहावर्ष व दहावर्षावरील Unclaimed Deposit बाबतची कार्यवाही करणेत येईल.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

**Annexure VI - शाखा अंतर्गत ग्राहकांनी केलेल्या रोख व्यवहाराबाबत**

CBS प्रणाली मधून शाखा अंतर्गत रोखीने व्यवहार करणे बाबत नियमावली खालीलप्रमाणे आहे -

- **बँकेचे खातेदार असलेल्या व्यक्तीसाठी रोखीने व्यवहार करणेबाबतचे नियम :-**

१) अशा खातेदारांना सर्व रोखीचे व्यवहार (जमा व नावे) करता येतील व या व्यवहारासाठी कमिशन / चार्जेसची रक्कम संबंधित सेवा शुल्क व इतर चार्जेसचे प्रचलित परिपत्रकानुसार घेणेची आहे.

२) जमेचे व्यवहार करताना शाखेने संबंधीत ग्राहक हा कोणत्या शाखेचा खातेदार आहे त्याची खात्री करणेची आहे व आवश्यक वाटल्यास योग्य त्या कागदपत्राच्या सत्य प्रती घेण्याच्या आहेत.

३) ज्या ग्राहकांचे खात्यात रक्कम जमा केली जाणार आहे याबाबत व्यवहार संशयास्पद वाटल्यास संबंधीत ग्राहकाचे संमतीपत्र घेण्याचे आहे.

४) नावेचे व्यवहार हे फक्त चेकने करण्याचे आहेत.

- **बँकेचे खातेदार नसलेल्या व्यक्तींनी करावयाच्या रोखीचे व्यवहाराबाबत सूचना :-**

१) सर्व रोखीचे जमा व नावे व्यवहार करता येतील व या व्यवहारासाठी कमिशन / चार्जेसची रक्कम संबंधित सेवा शुल्क व इतर चार्जेसचे प्रचलित परिपत्रकानुसार घेणेची आहे.

२) व्यवहार करणाऱ्या संबंधीत व्यक्तींचे ओळखपत्र (पॅनकार्ड/इलेक्शन कार्ड/आधारकार्ड/पासपोर्ट/ड्रायव्हिंग लायसन्स इ.) verify करून दप्तरी घ्यावे.

३) कोणताही व्यवहार संशयास्पद वाटल्यास संबंधीत व्यवहार करू नये.

४) ज्या ग्राहकाचे खात्यात रक्कम जमा केली जाणार आहे त्याबाबत व्यवहार संशयास्पद वाटल्यास संबंधीत ग्राहकाचे संमतीपत्र घेण्याचे आहे.

५) नावेचे व्यवहार फक्त चेकने करावयाचे आहेत.

The Karad Urban Co.op. Bank Ltd. Head Office Code No. 0 Scheduled Bank

## Annexure VII – कॅश भरणा बाबत

**Branch to Branch कॅश भरणा –**

आपल्या बँकेच्या एका शाखेतून दुसऱ्या शाखेत कॅश भरणा करावा लागतो. तसेच शाखेस कॅशची आवश्यकता असल्यास आपल्या बँकेच्या नजीकच्या शाखेतून आपण कॅश आणत असतो. सदर व्यवहार Inter Branch Transction खात्यामध्ये खालील प्रमाणे करावा.

उदा– १) मलकापूर शाखेस तळभाग शाखेत कॅश भरणा करावयाचा असल्यास प्रथम कॅश व्यवहार मलकापूर शाखेने करावा.

२) जर मलकापूर शाखेस कॅशची आवश्यकता असेल व मलकापूर शाखेने तळभाग शाखेकडे कॅश मागणी केली असेल व तळभाग शाखेकडून कॅश उपलब्ध होत असेल तर तळभाग शाखेने प्रथम व्यवहार करावा.

- व्यवहार खालीलप्रमाणे करावा :– मलकापूर शाखा कॅश भरणा तळभाग शाखेस करते तेव्हा मलकापूर शाखेस प्रथम खालीलप्रमाणे व्यवहार होतील.

- **मलकापूर शाखा :–**

Head Cashier Login ने सदर चलन मारावे.
Cashier window >> Payment >> Cash In Transit with.

To Branch :- ज्या Branch मध्ये कॅश भरणा करावयाच्या आहे. सदर Branch किंवा जी Branch कॅश घेणार आहे. सदर Branch Select करावी व Submit करावे.
Account No Click केलेवर जी शाखा Select केली आहे. सदर शाखेचा Head Cashier Select होईल. नंतर Particulars, Amount भरलेनंतर Name of person sent By - कॅश घेवून जाणाऱ्या व्यक्तींचे नाव नोंद करावे. Name of person sent to - ज्या व्यक्तीस कॅश दिली त्याचे नाव (हेड कॅशिअर) तळभाग शाखा कॅश Denomination ज्या प्रमाणे कॅश दिली आहे त्याप्रमाणे Denomination नोंद करणे नंतर Entry Save करणे.

▪ **पासिंगसाठी :–**

Back office >> Transction Authorisation >> Cashier Vouchers >> Submit

सदर Entry Select करून चलनाप्रमाणे कॅश Denomination पाहून तसेच ज्या शाखेत प्रत्यक्ष कॅश भरणा होणार आहे त्याच शाखेचा नंबर व नाव येते का हे पहाणे व Entry पास करणे.

सदर व्यवहार Inter Branch Transction प्रमाणे होतात. शाखेतील रेमीटन्स रजिस्टरवर सदर कॅश व्यवहाराची नोंद करावी.

- **तळभाग शाखा :–**

सदर कॅश तळभाग शाखेत आलेनंतर तळभाग शाखेचे हेड कॅशिअरने खालीलप्रमाणे व्यवहार करावा– Cashier window >> Receipt >> Cash In Transit Receipt

येथे A/c No. तळभाग शाखा Head Cashier No. Defalt येईल. नंतर रक्कम भरणे व Submit करणे. नंतर Record Select करणे. नंतर शाखेने जमा करण्यास दिलेल्या चलनाप्रमाणे Denomination प्रमाणे कॅश Tally करणे.

- **सदर व्यवहारास पासिंग घेणे.**

Back office >> Transction Authorisation >> Valid Transaction Authorisation >> Submit करणे.

येथे Rec. No. Select करणे चलनाप्रमाणे कॅश नोंद झाली आहे का पाहून पासिंग देणे.तसेच शाखा रेमीटन्स रजिस्टरवर सदर कॅश व्यवहाराची नोंद करावी व संबंधित सेवकांचे सहया घेणे.

वरीलप्रमाणे ज्यावेळी मलकापूर शाखेस कॅशची आवश्यकता असेल त्यावेळी त्यांनी तळभाग शाखेकडून कॅश आणण्यास तळभाग शाखेने मलकापूर शाखेत कॅश भरणा केला असे दाखवून वरीलप्रमाणे व्यवहार तळभाग शाखा प्रथम करणे व नंतर मलकापूर शाखा कॅश व्यवहार करील.

वरीलप्रमाणे Branch to Branch कॅश भरणा व्यवहार करणे तसेच कॅश व्यवहाराबाबत हिशोब विभागास माहिती देणे.

The Karad Urban Co-op. Bank Ltd. Head Office
Code No. 0
Scheduled Bank

## Annexure VIII - अधिकार पत्र

मी श्री./श्रीमती______________________________________ रा.______________

प्रस्तुत अधिकारपत्राद्वारे लिहून देतो की,

मी आपल्या बँकेच्या _________________ शाखेचा खातेदार असून माझ्या वैयक्तीक तथा माझे फर्मचे नावे आलेले धनादेश, ड्राफ्ट इ.माझे वैयक्तीक कार्यबाहुल्यामुळे आपल्या _____________ शाखेमध्ये प्रत्यक्ष हजर राहून माझे खात्यामध्ये भरणे मला/आम्हास शक्य नाही. करीता मी/आम्ही माझे/आमचे वतीने श्री./श्रीमती. __________________________________________ रा._____________ ता._____________ जि. _______________, (मोबाईल क्र.__________________) यांना माझे/आमचे अधिकृत व कायदेशीर प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले असून त्यांना माझे/आमचे/ वैय्यक्तिक/फर्मचे नावे असणारे धनादेश, ड्राफ्ट इ.माझे/आमचे आपल्या बँकेमधील खाते क्र._____________________ मध्ये रोख रक्कम, धनादेश, विविध ड्राफ्ट व इतर माध्यमातून पैसे जमा करणेचे कायदेशीर पूर्णाधिकार दिले आहेत. त्यानुसार श्री./श्रीमती. ______________________________ यांनी प्रस्तुत अधिकार पत्र स्वीकृत केले असून त्याकरीता त्यांनी खाली सहया केल्या आहेत.

प्रस्तुत अधिकारपत्राचे आधारे जमा झालेली रक्कम, धनादेश व ड्राफ्ट इ.व्यवहाराबाबत वैधता सिद्ध करणेची माझी पूर्ण जबाबदारी राहील व त्याची बँकेस कसलीही तोषीस लागू देणार नाही अथवा त्याबद्दल कसलीही तक्रार करणार नाही.

प्रस्तुत अधिकारपत्र मी कायदेशीरीत्या बँकेस कळवून जोपर्यंत रद्द करत नाही तोपर्यंत प्रस्तुत अधिकारपत्र कायदेशीररीत्या अंमलात राहील.

**येणेप्रमाणे अधिकारपत्र लिहून दिले असे.**

दि. / /२०

__________________

**अधिकारपत्र लिहून देणार**

**श्री.**________________

**प्रस्तुत अधिकारपत्र मी स्वीकृत करतो.**

**अधिकारपत्र स्वीकारणार**

**श्री.**________________

## Annexure IX - ग्राहक सेवा व घ्यावयाची दक्षता

१. ग्राहकांनी चेकबुक आणि ए.टी.एम.कार्ड एकत्र ठेव नये तसेच पासबुक चेकबुक आणि ए.टी.एम.कार्ड सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

२. ग्राहकांनी कोऱ्या चेकवर सही करून ठेवू नये. चेकने व्यवहार करताना तो क्रॉस आणि अकौऊंट पेई करून द्यावा.

३. ग्राहकांनी ए.टी.एम.कार्डचा पासवर्ड (PIN) तसेच इतर कोणतीही माहिती कोणालाही देवू नये.

४. ग्राहकांनी ए.टी.एम.कार्डचा पासवर्ड (PIN) वेळोवेळी बदलणे तसेच तो लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

५. ग्राहकांनी आपल्या खात्याची माहिती, ए.टी.एम.कार्डचा पासवर्ड (PIN) तसेच ए.टी.एम.कार्डची माहिती कोणत्याही संगणकामध्ये स्टोर करून ठेवू नये.

६. ग्राहकांनी चेकने व्यवहार करणेपूर्वी आपल्या खात्यावरील शिल्लक रक्कम तपासून घ्यावी.

७. ग्राहकांनी चेक तसेच खात्याची महत्त्वाची कागदपत्रे रजिस्टर्ड पोस्ट अथवा नामांकित कुरिअर कंपनीनेच पाठवावी.

८. ग्राहकांनी वारस नोंद तसेच आपला पत्ता आणि मोबाईल नंबर यात बदल झाल्यास शाखेत भेट देवून बदल करून घ्यावा.

९. ग्राहकांची डिमांड ड्राफ्ट, मुदत ठेव पावती, चेकबुक, लॉकर किल्ली, ए.टी.एम. कार्ड वगैरे गहाळ झाल्यास ताबडतोब शाखेस कळविणे.

१०. ग्राहकांनी कर्जावरील व्याज तसेच कर्जहप्त्यासाठी Standing Instruction या सुविधेचा वापर करावा.

११. बँकेने उपलब्ध केलेल्या ATM, NACH, NEFT, RTGS, SMS ALERT, E-Statement या सुविधेचा ग्राहकांनी वापर करावा.

१२. ग्राहकाने अनोळखी व्यक्तीस बँकेत खाते उघडताना त्यास Introduce करू नये.

## Annexure X

## स्वयंघोषणा पत्र (अ)

मी ---------------------------------- (सेवक क्रमांक- ............)

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, दि..................... रोजी -----------

------ शाखेमध्ये रक्कम रू.............. (अक्षरी रूपये --------------------

------------------------- ) ची मुदत ठेव केली असून, सदर रक्कम ही माझी

वैयक्तिक स्वरूपाची आहे.

ठिकाण :

सेवकाची सही : ...........................

दिनांक :

सेवकाचे नाव : ----------------

# स्वयंघोषणा पत्र (ब)

मी ----------------------------------- (सेवक क्रमांक- ............)

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, माझ्या दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड मध्ये खालीलप्रमाणे मुदत ठेवी केलेल्या आहेत.

| अ.क्र. | शाखा | दिनांक | खाते पक्रार | खाते क्रमांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वरील सर्व मुदत ठेवींची रक्कम ही माझी वैयक्तिक स्वरूपाची आहे.

ठिकाण : सेवकाची सही : ..........................

दिनांक : सेवकाचे नाव : ---------------

# स्वयंघोषणा पत्र (क)

मी ---------------------------------- (सेवक क्रमांक- ............)

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, माझ्या दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड मध्ये खालीलप्रमाणे बचत ठेवी आहेत.

| अ.क्र. | शाखा | खाते क्रमांक |
|---|---|---|
| | | |

वरील सर्व बचत ठेवींमध्ये जमा झालेली व होणारी रक्कम ही माझी वैयक्तिक स्वरूपाची असेल.

ठिकाण :  सेवकाची सही : ...........................

दिनांक :  सेवकाचे नाव : ---------------

## Annexure XI

**शाखा – -------------------**

**हमीपत्र**
**(इण्डेमनीटी बाँड)**

लिहून देणार – -----------------------------------------------------
लिहून घेणार – शाखा व्यवस्थापक, दि कराड अर्बन को-ऑप बँक लि. कराड (शेड्यूल्ड बँक)
शाखा – -----------

हमीपत्र लिहून देते/देतो की, आपल्या ---------------------------------- शाखेत आमची मुदत ठेव पावती नं.---------- खाते क्र. ------------------------ रुपये -------------/- ची मुदत ठेव दि. / /२० ते / /२० मुदतीची ठेव पावती आमचेकडून गहाळ झाली आहे. बराच शोध करून ठेव पावती आम्हास सापडलेली नाही.

तरी सदर पावतीपोती आम्हास नवीन डुप्लीकेट ठेव पावती मिळावी. सदर मूळ ठेव पावती आम्हास सापडल्यास ती मी त्वरित बँकेकडे आणून देईन.

सदर ठेव पावतीबाबत दुसरे कोणी हक्क सांगू लागलेस त्या अन्य कोणास सापडल्यास व त्यामुळे बँकेस काही तोशीश पोहोचल्यास होणा-या नुकसानीस मी स्वतः वैयक्तिकरित्या जबाबदार आहे व होणाऱ्या नुकसानीची भरपाई करून देण्याची हमी देत आहे. तसेच सदरची अस्सल ठेव पावती मी कोणाकडेही गहाण, दान केलेल्या नाहीत अगर त्या पावत्यांवर कोणाकडून कसलीही रक्कम ॲडव्हान्स म्हणून अगर कर्ज म्हणून उचलेली नाही. सदरचे पावत्यावरून कोणी कसलीही मागणी आपले बँकेकडे केलेस सदर पावत्यातील देय असणारी सर्व रक्कम सव्याज ताबडतोब मी तुमचे बँकेत परत करेन. तशी ती मी परत न केलेस माझे विरुद्ध कायदेशीर कारवाई करून सदरची रक्कम सव्याज वसूल करून मागनेचा तुमचे बँकेस पूर्ण हक्क व अधिकार आहे.

हे हमीपत्र मी स्वखुशीने लिहून देत आहे. बँकेस कोणत्याही प्रकारे तोशीश अगर नुकसान अगर बाधा न येण्याची जबाबदारी या हमिपत्राद्वारे माझेवर घेत आहे. तसेच याबाबत आमचे वारसही जबाबदार राहतील. म्हणून हा इण्डेमनीटी बाँड लिहून दिला आहे.

खातेदार सही : -----------------------
खातेदाराचे नाव : ---------------------------------------------
खातेदारचा पत्ता व मोबाईल नं.:----------------------------------

जामीनदार सही : -----------------------
जामीनदाराचे नाव : ---------------------------------------------
जामीनदाराचा पत्ता व मोबाईल नं.: --------------------------------